# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. २३/१०/२००३

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा सोमवार दिनांक २३/१०/२००३ रोजी सभा सुचना क्र. २० दि. १८/१०/२००३ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मॉरस रॉड्रीक्स हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

### उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मॉरस रॉड्रीक्स | सभापती |
| २) | श्री. पाटील मोहन मधुकर | सदस्य |
| ३) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| ४) | श्री. कुरेशी याकुब इस्माईल | सदस्य |
| ५) | श्री. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| ६) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ७) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | सदस्य, |
| ८) | श्री. नितीन गोपीनाथ ठाकूर | सदस्य |
| ९) | श्री. नलावडे दिनेश द. | सदस्य |
| १०) | श्री. पाटील अशोक बळवंत | सदस्य |
| ११) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| १२) | श्री. हॅरल बोर्जीस | सदस्य |
| १३) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | सदस्य |
| १४) | श्री. पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| १५) | श्री. जोजफ जॉन घोन्सालवीस | सदस्य |
| १६) | श्रीम. रिटा सुभाष शहा | सदस्या |

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग, आपणा सर्वा चे स्वागत करून आजच्या सभेच्या कामकाजाला प्र. सचिवांनी सुरूवात करावी.

**मोहन पाटील :-**

सभापती महोदय, सर्व उपस्थित अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग व स्थायी समितीचे सर्व सन्मा. सभासद आपण शहराचे विकासाचे काम करत आहोत आणि शहरात दिवाळी आली आहे आणि शहरात चांगले वातावरण राहावे याकरिता मी पक्षाच्या वतीने आणि माझ्या सहकारी नगरसेवकांच्या वतीने सर्वांना ही दिपावली चांगली, सुखसमृद्धीची आणि भरभराटीची जावो अशी मी शुभेच्छा व्यक्त करतो. धन्यवाद.

**शरद पाटील:-**

हया दिवाळी निमित्त सर्व सन्मा. सदस्य, सभापती साहेब आणि कर्मचारी वर्ग, अधिकारी वर्ग हयांना मी भाजपाच्यातर्फे ही दिवाळी सुखाची, समृध्दीची, भरभराटीची आणि चांगली जावो अशी शुभेच्छा देतो.

**मिलन म्हात्रे :-**

मिरा भाईंदर शहरातील सर्व नागरिकांना महानगरपालिकातर्फे हया शहराच्या गेल्या अनेक महिन्यापासून येणारे सर्व सणाकरिता प्रशासनातर्फे आणि आरोग्य विभागातर्फे वेळोवेळी घेतलेली दखल यामुळे आपण शहरामध्ये निरनिराळे सण आनंदाने साजरे करु शकतो आणि ही दिवाळीसुध्दा अशाच

प्रकारे सर्वांना सुखसमृध्दीची, भरभराटीची जावे व मनपा प्रशासन अधिकारी, सर्व पदाधिकारी, कर्मचारी हयांना मिरा भाईंदर जनता दलातर्फे माझ्या हार्दिक शुभेच्छा देत आहेत.

**अनंत पाटील :-**

स्थायी समिती सभासद मॉरस रॉड्रीक्स साहेब हयांच्या उपस्थितीत प्रथमच हा दिवाळी सण साजरा होण्याच्या मार्गावर आहे आणि अशा अवस्थेत मिरा भाईंदरवासियांचे आरोग्य त्याचबरोबर निरनिराळ्या नागरी समस्या सोडविण्यासाठी आजच्या दिवाळीच्या निमित्ताने नागरिकांना मॉरसजी रॉड्रीक्स साहेबांकडून जी अपेक्षा आहे ती अपेक्षा पूर्ण होईल अशी मी मिरा भाईंदर नगरवासियांच्या वतीने आणि शिवसेना गटाच्या वतीने मी त्यांना पुढील जे दिवस आहेत. ते चांगले जातील अशी मी त्यांना शिवसेनेच्या वतीने अभिनंदन करतो आणि मिरा भाईंदर रहिवाश्यांना ही दिवाळी सुखसमृध्दीची जावो अशी शुभेच्छा व्यक्त करतो.

**दिनेश नलावडे :-**

सभापती साहेब, उपआयुक्त केळकर साहेब, माजी सभापती मोहन पाटील साहेब, सन्मा. सर्व स्थायी समिती सदस्य या ठिकाणी उपस्थितीत अधिकारी वर्ग आणि हया शहरातील सर्व नागरिकांना ही दिवाळी सुखाची, समृध्दीची आणि भरभराटीची जावो अशी मी कॉंग्रेस पक्षाच्यावतीने शुभेच्छा देतो आणि शहरातील विकासाच्या कामासाठी सन्मा. सभापती साहेब हयांच्या कारर्कीदीमध्ये हया शहरवासियांना चांगली सुविधा मिळेल अशी अपेक्षा करुन सर्व नागरिकांना मी पुन्हा एकदा हार्दिक शुभेच्छा देतो. धन्यवाद.

**मा. सभापती :-**

सर्व स्थायी समितीचे सभासदांना तसेच प्रशासन आणि उपआयुक्त केळकर सा़ो. तसेच आपल्या सर्व कर्मचा-यांना आणि भाईंदरच्या माजी नगरसेवकांना दिवाळीची शुभकामना देतो. तसेच नविन येणारे वर्ष सुखसमृध्दीचे जावो अशी मी आशा करतो.

**कल्याण केळकर (मा.उपआयुक्त सा़ो.) :-**

महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने सर्व नगरसेवक, मिरा भाईंदर शहरातील नागरिक, सर्वांना दिपावली आणि नवीन वर्ष सुखसमृध्दीचे जावो अशी प्रशासनसाच्या वतीने सर्वांना शुभेच्छा देतो. धन्यवाद.

(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १५१ चे वाचन केले.)

**मिलन म्हात्रे :-**

पान क्र. ५ वर तुमची रुलिंग होती. त्याचे काय झाले. लोकल सेल्फ गव्हर्नमेन्टकडे आतापर्यंत कितकी कोर्स झाले व त्यांनी किती वेळा आपल्याला पत्र पाठविले आहे आणि मी असे विचारले आहे. आम्ही त्या लेक्चर्सना प्रशासनाच्या चुकीमुळे अनुपस्थित राहू शकलो. त्याचा आम्ही तुमच्याकडे विगतवार मागितला होता. ती आम्हाला कुठेही दिसत नाही. ते फार महत्वाचे आहे. आम्हाला असे कळले की, आम्ही दरवेळेला तुमच्या महानगरपालिकेला कळवितो. परंतु, जर महानगरपालिका तुम्हाला ह्याच्यातले जर का काही सांगत नसेल तर तुम्ही आम्हाला फोन करुन संपर्क साधा. आम्ही तुम्हाला कळवु. ही परिस्थिती अशी आपल्याकडे का यावी. हयाची कुठे चर्चा झाली नाही.

**कल्याण केळकर (मा.उपआयुक्त सा़ो.) :-**

आता नव्यानेच महिला नगरसेवकांना प्रशिक्षणासाठी पत्र आलेले आहे. सर्व महिला नगरसेविकांना आम्ही लेखी पत्र पाठविलेले आहे आणि ऑल इंडियाला आम्ही १०, ११, १२ तारखा कळविल्या आहेत. गेल्या वेळेला पत्र आले होते. पण त्यावेळी गणेशोत्सव होता.

**मिलन म्हात्रे :-**

मी ज्यावेळी पुण्याला यशदामध्ये गेलो. त्यानंतरचा तो एक पाच-सहा महिन्याचा काळ आहे. जो गेलेला काळ आहे. त्याचे मी येथे सांगतोय. हा जो तुमचा प्रपोझ प्रोग्राम आहे. तो पिरीयड गेला. त्याच्यामध्ये त्यांनी किती तुम्हाला पत्र पाठविली. तुम्ही त्याची दखल घेतली नाही आणि आम्हाला कळविले नाही किंवा बिलकुल पत्रच आली नाही असे असेल तर असे सांगा.

**कल्याण केळकर (मा.उपआयुक्त सा़ो.) :-**

यशदामधून जेवढी पत्र आली. ती संबंधित अधिका-यांना प्रशिक्षणसाठी पाठविली होती. नगरसेवकांना नव्हती.

**मिलन म्हात्रे :-**

दोन ठिकाण सांगतो मी दिल्ली आणि लोकल सेल्फ गव्हर्नमेन्ट आणि जे स्वायत्त संस्था आहेत. ते आम्हाला शिकवतात. ह्या तीन ठिकाणचे कार्यक्रम हयाचे पत्र तुमच्याकडे किती आली किंवा आली का नाही.

**कल्याण केळकर (मा.उपआयुक्त सो.) :-**

जेवढी पत्र आलेली आहेत. तेवढे आपण सभासदांना वेळोवेळी कळविलेले आहे आणि हयानंतर जर पत्र आली तर त्याची दखल घेण्यात येईल आणि लवकरात लवकर आपण नगरसेवकांना प्रशिक्षणाला पाठविण्यात येईल आणि आता अधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षणाकरिता पत्र आलेली आहेत. त्यासाठी आपण टाऊन प्लॅनिंगच्या अधिकाऱ्यांना प्रशिक्षणसाठी पाठविले होते व बारकुंड हे वाल्मिकी आंबेडकर प्रशिक्षणासाठी होते. त्याकरिता उपअभियंता दर्जाचे अधिकारी हयांना पाठविले.

**मिलन म्हात्रे :-**

नगरसेवकांसाठी आलेले नाही.

**कल्याण केळकर (मा.उपआयुक्त सो.) :-**

नाही. नगरसेवकांसाठी पत्र आलेले नाही.

**शिवमूर्ती नाईक (मा.उपआयुक्त सो.) :-**

सभासदांना बोलावण्यासाठी जेवढी पत्र आली. त्या त्यावेळी सर्व सभासदांना कळविले व ज्यांनी ज्यांनी जायची इच्छा व्यक्त केली. त्यांना प्रशिक्षणासाठी पाठवले आहे. पत्र आले आणि कळविले नाही असे एकही पत्र नाही.

**आसिफ शेख :-**

आता आपण माहिती दिली अधिकाऱ्यांच्या शिक्षणाबाबत आणि बहुतेक नगरसेवकांना व सन्मा. सदस्यांना प्रशिक्षण यापूर्वीच मिळालेले आहे आणि प्रशिक्षण मिळाल्यांनतर सभागृहात भाषाशैली म्हणा किंवा सभागृहाचे कामकाज कोणत्या पध्दतीने चालले पाहिजे आणि कशा पध्दतीने वागले पाहिजे. तर हयाचेदेखील प्रशिक्षण बहुतेक नगरसेवकांना मिळालेले आहे आणि प्रशिक्षण घेतल्यानंतर त्याची अंमलबजावणी प्रत्यक्षात व्हायला पाहिजे. ती दिसत नाही. कृपया येथून पुढे सभागृहाचे कामकाज शिस्तबध्द पध्दतीने आणि संसदीय कामकाजाप्रमाणे व्हावे.

**प्रकरण क्र.१५१:-**

दिनांक ३/१०/२००३ रोजीचे मा.स्थायी समितीचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. १३१ :-**

दि. ०३/१०/२००३ रोजीच्या मा. स्थायी समितीच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. हरेश गावंड. अनुमोदन :- श्री. मिलन म्हात्रे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १५२ चे वाचन केले.)

**चंद्रकांत वैती :-**

मा. सभापती साहेब, उपआयुक्त साहेब. विरोधी पक्षाचे कॅबिन आहे. त्याच्यामध्ये आजही ॲन्टी चेंबर उपलब्ध होऊ शकले नाही. याबाबत सातत्याने विरोधी पक्षनेते हयांनी अधिकाऱ्यांशी आणि महापौरांशी, स्थायी समितीच्या सभापतींशी किंवा सदस्यांशी बोलत असतात आणि तसा पत्रव्यवहार केलेला आहे आणि आपण तुलनात्मक दृष्ट्या पाहिले तर विरोधी पक्ष नेते पद हे अगदी छोटे पद आहे, अशातला भाग नाही. मा. महापौरांच्या दर्जाचे पद आहे आणि त्यांना ॲन्टी चेंबर असायला पाहिजे आणि याकरिता वारंवार विरोधी पक्षनेत्यांनी मागणी केलेली आहे आणि ह्यासाठी आजच्या स्थायी समितीने योग्य तो निर्णय घ्यावा अशी मी पक्षाच्या वतीने विनंती करतो.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सभापती महोदय, मी मघाशी आपल्याला दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या आणि आनंदी वातावरण आहे. त्या आनंदी वातावरणात चांगले काम करुया. गेल्या मागच्या कालावधीमध्ये असे बरेच प्रस्ताव माझ्याकडे हयाबाबत आले होते. परंतु, आपण जेव्हा शहराच्या विकासाच्या बाबतीत कामकाज करत असतो. तेव्हा कोणते विषय आपण घेतले पाहिजे आणि कोणते विषय नाही घ्यायला पाहिजे. हयाचा अभ्यास आपणाकडून होणे जरुरी आहे. प्रशासन आपल्याला विषय देत असेल. प्रशासनाच्या बाबतीत खरोखर अडचण आहे. तो तंटा सुटू शकत नाही. एखादया विकासाच्या कामाच्या बाबतीत तर तो आपल्याला मान्य आहे. त्यासाठी आपण ॲन्टी चेंबरच्या बाबतीत विषय असेल आणि तो विकासाच्या बाबतीत विषय असेल तर आपण आपल्या दालनात बोलावून हा विषय सोडवायला पाहिजे. हे विषय आपण विषयपटलावर आणता आणि विषयपटलावर आणताना आपण हे विशद केले पाहिजे की, सभागृहाची त्याची कॅबिन काँग्रेसच्या वतीने सन्मा. सदस्य बोलले म्हणून मी माझ्या बोलण्याची पध्दत वेगळी करतो. तसे काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस हया दोघांची हया ठिकाणी सत्ता आहे. राष्ट्रवादी काँग्रेसकडूनच सभागृह नेत्याचे पद भरले आहे आणि विरोधी पक्षनेते पद आहे ते पद काँग्रेसकडे आहे आणि जर हा विषय तुम्ही सभागृहापुढे आणता. त्या सभागृहापुढे विविध पक्षाचे सहकारी नगरसेवक आहेत आणि त्यांच्यापर्यंत आपण हा विषय आणतो आणि असा विषय आणताना आपण पूर्णपणे विचार केला पाहिजे की, हा विषय तुम्ही विषयपटलावर कोणत्या कायदयाखाली आणता. कोणते विकासाचे काम हयामुळे अडलेले आहे. एखादयाला दालन उपलब्ध करायचे असेल मागच्या काही सभांमध्ये आमचे सन्मा. सदस्य मिलन म्हात्रेजी हयांनी गटनेत्यांना दालन पाहिजे म्हणून विषय आणला होता. रास्त विषय आहे. गटनेत्यांना दालन नव्हते आणि ते दालन दिले पाहिजे. तेथून त्यांची विकासाची कामे केली जातील व पक्षाचे प्रतिनिधी बसतील असा विषय होता. तो विषय मा. महासभेसमोर बोला किंवा अन्य सभेसमोर बोला किंवा गौरव कमिटीसमोर आसिफ शेखजी बोलतात. ते आणा आणि आणायला पाहिजे. एखादया विषया संबंधात जर आपण बोललात की दालन उपलब्ध करायचे आहे. त्यांना ॲन्टी चेंबर पाहिजे. आणि हे आपल्याच पक्षाचे विषय असतात आणि आपण ते विषय विषयपटलावर आणता. हा विषय कोणत्या हेतूने विषयपटलावर आणले आणि हया विषयाने कोणती विकासाची कामे होणार आहेत. मागच्या वेळेला माझ्यासमोर विषय आल्यानंतर मी प्रत्यक्ष माजी सभागृह नेते, कमिशनर साहेब आणि मी स्वतः बसून चर्चा करण्याचा प्रयत्न केला. आपण सक्षम आहात. आपण आपल्या दालनामध्ये बोलवा. सभागृह नेते तुमच्या दालनात येउ शकत नाही. तुम्ही तुमच्या ज्या पध्दतीने सजेशनने बोला. त्या पध्दतीने बोलून करु शकता. तुम्ही त्यांना बोलवा आणि बघा. हा तंटा सुटू शकेल की नाही किंवा हा तंटा आहे असे मी बोलत नाही. परंतु, हा विषयपटलावर विषय येण्याचा विषय नाही. प्रामुख्याने आपण हयाची जाण ठेवली पाहिजे. एखादा हा विषय देतो आणि आपण विषय आणतो. तर हा विषय होउच शकत नाही. त्यांना दालन उपलब्ध आहे. विरोधी पक्षनेते, सभागृह नेते हयांना आपण दालन दिलेले आहे. त्या दालनामध्ये जर एखादे ॲन्टी चेंबर हवे असेल तर आपण करु शकतो आणि तसे बघितले तर प्रामुख्याने मी त्यावेळी हया विषयावर सविस्तर अशी चर्चा केली होती. जी दोन दालने आहेत. ती दोन्ही दालने सभागृहाच्या उजव्या आणि डाव्या बाजुला ठेवा. जेव्हा सभागृहाचे कामकाज चालते तेव्हा हयांचे काम असते. आपण आम्हाला सांगा कि, जेव्हा त्यांचे कामकाज चालेल ते सभागृहाच्या बाजूला कामकाज चालते. सभागृहाच्या वेळेला ती त्यांच्या आवश्यकतेची बाब असते. सभागृहामध्ये काय कामकाज केले पाहिजे, कशा पध्दतीने काम केले पाहिजे किंवा आदेश कसे काढले पाहिजे, कोणत्या पध्दतीने गटनेत्यांना बोलले पाहिजे, असा विषय असतो आणि बहुतेक हे आपल्या महानगरपालिकेने केलेले आहे. अधिकारी आपल्याबरोबर समन्वय साधून असतात. नगरसेवक विरोधी पक्षाचे असू दे किंवा अन्य पक्षाचे असू दे. हे सगळे एकत्र असतात. एकत्र बसतात. पण कधीही कोणत्या बाजूने विषय गेला नाही. आता आपण उदया सांगू की, मा. महापौरांची कॅबिन मोठी आहे. ती थोडी छोटी केली पाहिजे. उपमहापौरांची कॅबिन मोठी आहे ती थोडी छोटी केली पाहिजे. स्थायी समितीचे दालन मोठे आहे ते छोटे केले पाहिजे. हा विषय होऊ शकत नाही विषयपटलावरचा. हा विषय को ऑर्डीनेशनचा विषय आहे. महापौर मॅडमकडे तुम्ही या व हया विषयावर चर्चा करा. आयुक्त साहेबांना बरोबर घ्या. कृपया आपण असे विषय आणू नका. अशा आनंदी वातावरणामध्ये आपण एखादी कॅबिन छोटी करता. हे विषय आपण आपल्या अखत्यारीमध्ये मा. महापौरांसमोर घेऊन जा. आपण जबाबदार

स्थायी समितीचे सभापती आहात. आपण जाउन मा. महापौर मॅडमला सांगा. हा विषय विषयपटलावर येण्याचा विषय नाही. अशी सूचना, विनंती मी आपल्याला हया ठिकाणी करत आहे. धन्यवाद.

**धनराज अग्रवाल :-**

आपण जो विषय आणला ॲन्टी चेंबर देण्याबाबत आमचा काही विरोध नाही. राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रस अशी आपली दोघांची सत्ता आहे. पण माझी तुम्हाला एक विनंती राहिल किती दिवसापासून मागे मोहनजी पाटील जे सभापती होते. तेव्हापासून आमच्याकडे थोडासा दुभाव चालला आहे. विरोधी पक्ष नेते बी.जे.पी. आहेत. तुमच्या सत्ता पार्टीला विरोधी पक्ष नेते कॅबिन मिळाले आहे. ॲन्टी चेंबर पाहिजे. तर त्याला आमची मंजूरी आहे. तुम्ही त्यांना दया. ॲक्चुअल विरोधी पक्ष भारतीय जनता पार्टी आणि शिवसेना आहे आणि शिवसेनेची संख्या येथे कमी असल्यामुळे त्यांनी ते कॅबिन घेतलेले आहे. आमच्या गटनेत्यांनी आपल्याला पत्र दिले. वारंवार विनंती केली. आमचे सदस्य जास्त असताना आम्ही बसू शकत नाही. आमचे कार्यकर्ता बसू शकत नाही. आमचे पदाधिकारी बसू शकत नाही. त्या सर्वांनी ते मंजूरसुध्दा केलेले आहे. मा. महापौरांनी मंजूर केले आहे, मोहन पाटील साहेबांनीदेखील मंजूर केलेले आहे. आधी मंजूर केले नव्हते. आता मंजूर केले की, त्यांना दयायला पाहिजे. मॉरसजी रॉड्रिक्स हयांनीदेखील सिद्धांत मंजूर केलेले आहे. केळकर साहेबदेखील बोलतात. दयायला पाहिजे. अडचण कोणाची आहे? ते आपण आम्हाला सांगा की, हा माणूस अडचण करतोय आणि तुम्हाला कॅबिन नाही. दयायला पाहिजे. सभापती साहेब दयायचे नसेल तर आपण आम्हाला सांगा की, दयायचे नाही. दयायचे असेल तर आपण त्याचा खुलासा करा आणि चोवीस तासात तुम्ही करु शकता. तुम्ही आम्हाला चेंबर का देत नाही. सगळयांच्या चेंबरचे उदघाटन झाले. त्यांचे सगळे कार्यकर्ता बसतात. बी.जे.पी. वाले कुठे बसू शकत नाही. तुम्ही नक्की करा की, तुम्हाला दयायचे आहे का नाही दयायचे. विरोधी पक्ष म्हणून नाही दयायचे तर चालेल. देउ नका.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती महोदय, आता जे धनराजजी अग्रवालने सांगितले की, बी.जे.पी. ही विरोधी पक्षातला सगळयात जास्ती मोठा पक्ष आहे. जास्त नगरसेवक आमच्यापर्यंत आहेत. पण ज्या शहराच्या सभागृहाच्या कामकाजाच्या इतिहासामध्ये आतापर्यंत महत्वाचे विषय आल्यावर भारतीय जनता पार्टीच्या मोठया पक्षांनी नरो वा कुंजरावाचीच भूमिका घेतली. विरोध केला नाही. त्यामुळे विरोधी पक्ष कुठला आहे. ते बोलण्याचा अधिकार त्यांना नाही आहे. ऑक्ट्रॉयमध्ये तेच झाले. ते तटस्थ झाले. आम्ही विरोधी मतदान केले. आम्ही दाखवून दिले. आम्ही विरोधी आहोत ते. मतदानाने सिध्द केले. त्याकरिता मेहेरबानी करुन असे बोलु नये. अनेक असे वादग्रस्त विषय आहेत ते आपण बोलायला लावु नका.

**शरद पाटील :-**

आपण बोलावे आणि त्याला आम्ही उत्तर देतो. तुम्ही बोलायला लावु नका असे म्हणण्यापेक्षा आपण बोलावे. सभापती महोदय, त्यांना काय बोलायचे आहे ते त्यांना बोलायला सांगा.

**मिलन म्हात्रे :-**

आपण ऑक्ट्रायमध्ये तटस्थ भूमिका घेतली.

**शरद पाटील :-**

आम्ही कुठे तटस्थ भूमिका घेतली आणि कुठे बोललो हे आम्ही उत्तर देतो. तुम्ही तुमचे बोला.

**धनराज अग्रवाल :-**

एकमेव पक्ष असा होता ज्यांनी ऑक्ट्रायचा विरोध केला होता आणि उपकर लावला पाहिजे असे बोललो होतो. आपण माझे मा. महासभेचे इतिवृत्तांत बघा.

**चंद्रकांत वैती :-**

आजच्या सभापटलावरचा विषय ऑक्ट्रायचा नाही. एकतर आपल्याला ह्या बाबतीत चर्चा करायची होती की विरोधी पक्ष नेत्यांना अँटी चेंबर देणेबाबत. याबाबत आतापर्यत सन्मा. मोहन पाटील आणि धनराज अग्रवालजी ह्यांनी वाच्यता केली. येथे काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसची युती आहे. त्याच्यामुळे हा प्रश्न तसा सहज मा. महापौर साहेबांकडे बसल्यावर सुटू शकतो. कारण वारंवार सभागृह नेते हे अँटी चेंबरमध्ये बसलेले नसतात किंवा विरोधी पक्ष नेता हा अँटी चेंबरमध्ये बसणार नाही. आपल्याला मधला एक पर्याय काढता येईल की, त्याला दोन्ही बाजूंनी एक एक दरवाजा करावा आणि ज्याला अँटी चेंबरचा वापर करायचा आहे त्यांना तो करता येईल. असा एक मार्ग निघू शकतो

आणि तशी हरकत नसेल तर संबंधित अधिकाऱ्यांनी आणि सभापती साहेबांनी ह्या विषयावर योग्य तो मार्ग काढावा आणि आताच सन्मा. धनराजजी बोलले की बी.जे.पी.चे एवढे नगरसेवक आहेत आणि कॉंग्रेसचे एकोणीस अधिक दोन म्हणजे एकवीस नगरसेवक आहेत. एका वेळेला ते एका रूममध्ये ॲडजेस्ट होऊ शकत नाही. परंतु दररोज सर्व सदस्य येउन त्या सभागृहात बसतीलच असे नाही. जर आपण तजवीज केली की गटनेत्यांना बऱ्याच वेळेला आपल्या नगरसेवकांशी संपर्क साधायचा असतो किंवा त्यांना इतर पक्षाशी संबंधित असलेली कामकाज, जनतेशी संबंधित असलेले कामकाज येथे व्यवस्थित पार पाडता येतात. अधिकाऱ्यांकडे बसल्यानंतर एका पक्षाचा नगरसेवक असेल तर दुसऱ्या पक्षाच्या नगरसेवकाला निमूटपणे बसावे लागते. तिथे चर्चा होत नाही. त्यासाठी गटनेत्यांची दालने असावी असे सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे यांनी अतिशय चांगली सूचना केली होती आणि त्याला पाठिंबा म्हणजे त्याला अगदी मुहुर्त स्वरूप येईपर्यंत मागे लागले होते. सन्मा. माजी सभापती मोहन पाटील साहेब ह्यांनी एक चांगला निर्णय घेतला होता. तरी याबाबत अधिकाऱ्यांना, सभापती साहेबांना ह्याबाबत विनंती आहे की, आपण बी.जे.पी.च्या गटनेत्यांसाठी योग्य ती जागेची तजवीज करावी आणि ह्या विषयावर पुन्हा वादविवाद करण्यापेक्षा आपण त्याच्यात निर्णयात्मक यश कसे मिळेल ते बघावे.

**धनराज अग्रवाल :-**

आपण हो किंवा नाही असे आम्हाला स्पष्ट सांगा.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सभापती साहेब ह्या ठिकाणी हा जो ॲंटी चेंबरचा विषय आलेला आहे. विरोधी पक्षनेत्यांना ॲंटी चेंबर मिळाला पाहिजे. या संदर्भातील विषय विषयपटलावर आलेला आहे. विरोधी पक्षनेता म्हटले तर घटनेप्रमाणे आणि कायदेशीरदृष्टया अतिशय महत्तवाचे पद आहे. संविधानिक पद आहे आणि विरोधी पक्ष म्हटल्यानंतर त्याला सत्ताधारी पक्ष सोडून अन्य सगळे जे राहिले ते विरोधी पक्ष आणि त्यांचा तो नेता म्हणजे विरोधी पक्षनेता सन्मा. सदस्य धनराज अग्रवालजी ह्यांनी जो मुद्दा उपस्थित केला की, प्रत्यक्षात विरोधी पक्ष आम्ही आहोत. परंतू धनराजजी ह्या ठिकाणी मी आपणांस सांगू इच्छितो, सभागृहाला सांगू इच्छितो की, मिरा भाईंदर शहरात हा इतिहास झालेला आहे आणि सन्मा. आपल्या सर्वांचे लाडके नेते ह्या शहराचे प्रथम नगराध्यक्ष आदरणीय गिल्बर्ट जॉन मेन्डोंसा साहेब आणि ह्या शहराचे प्रथम आदरणीय मा. महापौर मायरा गिल्बर्टजी मेन्डोंसा ह्यांनी जो निर्णय विरोधी पक्षनेत्या संदर्भात दिला की सर्वाधिक संख्या सत्ताधारी पक्षाची सोडून सर्वाधिक संख्या ज्या गटाची आहे त्या गटाचा तो प्रमुख विरोधी पक्षनेता राहील, असे कायदेशीररित्या निर्णय दिला आणि संपूर्ण प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले आणि उच्च न्यायालयात देखील मा. महापौरांचा निर्णय कायम करण्यात आला. जेव्हा एखादी गोष्ट उच्च न्यायालयात गेली आणि शिक्कामोर्तब झाली आणि विरोधी पक्षनेता हा कायम झाला. त्याच्यानंतर पुन्हा असे भाजपाकडून वक्तव्य व्हायला नाही पाहिजे आणि ते झालेले आहे आणि विरोधी पक्षनेते पद जरी कॉंग्रेसकडे गेले तरी कॉंग्रेस पक्ष हा सगळया पक्षाचा, जरी जनता दल पक्ष, बी.जे.पी. पक्ष, शिवसेना पक्ष असेल तरी तो त्या सर्वांचाच विरोधीपक्ष नेता झाला, सत्ताधारी पक्ष सोडून आणि मा. उच्च न्यायालयात मान्यता दिलेला आहे. आता प्रश्न असा आहे की विरोधी पक्ष नेत्याला ॲंटी चेंबर मिळायला पाहिजे. त्यात आमचा दुजाभाव नाही किंवा द्यायला पाहिजे नाही द्यायला पाहिजे असे काही नाही. पण ह्या ठिकाणी सन्मा. जेष्ठ सदस्य माजी सभापती मोहनजी पाटीज ह्यांनी आपली भावना व्यक्त केलेली आहे की हा विषय प्रशासनाचा आहे. हा आपल्या स्थायी समितीमध्ये विषय येण्यासारखा नव्हता. प्रशासनाने ह्या ठिकाणी असे विषय का आणले किंवा नक्की प्रशासनाचा ह्या मधला हेतू काय हे समजत नाही. तर हे असे किरकोळ विषय आणायचे आणि वाद निर्माण करायचा अशी प्रशासनाची भूमिका दिसते आणि हे संपूर्ण मॅटर जसे सन्मा. सदस्य मोहनजी पाटील ह्यांनी सांगितले की मा. महापौर साहेबांकडे जाउन या संदर्भात आपण तोडगा काढू शकतो. मागच्या वेळी देखील चर्चेला सन्मा. सदस्य सुलभ असा वादग्रस्त विषय ह्या ठिकाणी आणलेला नाही. तर माझे असे ह्या ठिकाणी स्पष्ट असे मत आहे हा प्रशासनाचा विषय नाही आणि प्रशासनाने असा विषय स्थायी समितीसमोर नाही आणायला पाहिजे. सभापतींच्या नजरचुकीने समजा आला असेल आम्ही असे गृहीत धरतो की नजर चुकीने विषय आला. कृपया या संदर्भात आपल्या आदरणीय मा. महापौर ह्यांच्याबरोबर आपण स्वतः आणि स्थायी समिती सभापती म्हणून व विरोधी पक्षनेते परशूराम पाटीलजी आणि सभागृह नेते लिओ कोलासोजी अशी एक संयुक्तिक बैठक आयोजित करा आणि त्यामध्ये सामोपचाराने निर्णय घेतला तर अतिशय योग्य होईल असे मला ह्या ठिकाणी वाटते.

**मा. सभापती :-**

आसिफ शेख आणि मोहन पाटील ह्यांनी मांडलेली सूचना बरोबर आहे. परंतु बांधकाम विभागाचे खांबीत साहेब ह्यांच्याकडे वारंवार तक्रार झाल्यामुळे व जेव्हा मोहन पाटील सभापती होते तेव्हा देखील त्यांच्याकडे वारंवार तक्रारी आली असेल. हा विषय मोहन पाटलांनी घेतला नाही आणि मी आता येथे नविन आलो तेव्हा ह्या लोकांनी येथे हा विषय मांडला आणि मांडलेला विषय हा बरोबर आहे किंवा खराब नाही आहे. ह्याच्यावर त्या लोकांनी का आणले तर तुमच्या प्रेशरमुळे बांधकामवाले काही करू शकत नाही. म्हणून त्यांनी स्थायी समिती समोर विषय आणलेला आहे. तर स्थायी समिती कशाकरिता आहे तर ह्याच्यावर निर्णय घेण्यासाठी. निर्णयचा प्रश्न आहे कोणला लहान किंवा मोठी कॅबिन बांधा. त्यांच्यात काय भेदभाव करायचा नाही आपल्याला समांतर करायचे आहे. आपण एकत्र बसूनही करू शकतो. पण हा विषय कधी झाला नाही म्हणून हा विषय स्थायी समितीसमोर ह्या लोकांनी आणला, असे असेल तर आपण बसून ह्या विषयावर निर्णय घेउ.

**मोहन पाटील :-**

सभापती महोदय, आपण जे बोललात ते योग्य आहे. आपण कृपया ह्या विषयावर चर्चा करू नका. आपण संबंधितांना बसवून हा विषय करून घ्यावा. म्हणजे आता एखादा सन्मा. सदस्य इन टू ब्रॅकेट बोलले दोन पक्षांचा वाद आहे. बांधकाम समिती काय करते आणि बांधकाम समितीने काय केले पाहिजे आणि बांधकाम समितीला जर कोणत्या गोष्टी होत नाही तर कोणत्या निर्देशाने बांधकाम समितीने ह्या कॅबिनला दालन दिली हे तुम्ही बांधकाम समितीच्या अधिकाऱ्याना तुम्ही विचारा की त्यांनी कोणत्या आदेशान्वये ह्या कॅबिन त्यांनी केल्या. मा. उपमहापौरांची कॅबिन चेंज करून घेतली. त्यावेळेला कोणते आदेश, निर्देश कोणत्या सभेतही झाले नव्हते. सभागृह नेत्याला कॅबिन दिले तेव्हा कोणते आदेश, निर्देश झाले नाहीत. स्थायी समितीला कॅबिन देण्यात आले तेव्हा कोणते आदेश निर्देश झाले नाहीत. तेव्हा तुम्ही सक्षम नसाल आणि जर सगळे विषय तुम्ही सभेपुढे आणून ठेवत असाल तर ही चुकीची बाब आहे. म्हणजे एखाद्या सभेमध्ये एखाद्या सभापतींनी किंवा एखादा सत्ताधारी जो कोण सभा चालवत असेल त्याला जर अधिकारी चुकीची माहिती देत असेल तर ती माहिती अतिशय गैर माहिती आहे आणि ज्या दालनामध्ये अँटी चेंबर पाहिजे आणि अँटी चेंबर दोघांनाही दालन त्या ठिकाणी उपलब्ध आहे. विरोधी पक्ष नेत्याला दालन उपलब्ध आहे आणि सभागृह नेत्याला दालन उपलब्ध आहे आणि जर का दालन उपलब्ध नसते तर आपण सांगू शकता की त्यांना दालन उपलब्ध नाही आपण त्यांना दालन उपलब्ध करून द्या. परंतू अँटीचेंबरसाठी एखादा विषय सभेपुढे आला पाहिजे म्हणजे आपण जर एखादी गोष्ट समोर बसून सामोच्च्याने करू शकतो तर तसा प्रयत्न केला पाहिजे. पण तसा प्रयत्न केला गेला नाही. आपण मा. महापौर साहेबांकडे जायला पाहिजे, स्थायी समितीच्या सभापतींना सांगायला पाहिजे. त्यांना एकत्र बसविले पाहिजे. आपण एकत्र बसून काम केले पाहिजे. आपण कोणतेही काम करताना सभेची पूर्व परवानगी न घेता अशी कामे ह्यापूर्वी झालेली नाहीत.

**दिपक खांबीत :-**

ह्यापूर्वी कॅबिन देताना कुठलाही वाद झालेला नाही आणि विरोधी पक्षनेते ह्यांना अँटी चेंबर पाहिजे आणि ह्यापूर्वीचे सभागृह नेते ह्यांनी सांगितले की आमचे कॅबिनची साईज कमी करायची नाही. त्यामुळे हा वाद झाला.

**मोहन पाटील:-**

तुम्ही हयाला वाद कसे बोलू शकता. त्यांना आवश्यक बाब जी आहे. तर तुम्ही दानल चेंज करुन घ्या. दुसरे दालन देउन तुम्ही बघा. जेव्हा एखादे दालन काँग्रेस पक्षाच्या लोकांनी हा विचार केला पाहिजे. सन्मा. सदस्यांना, जेव्हा विरोधी पक्ष नेते पद दिले जाते. तेव्हा मा. महापौर पिठासीन अधिकारी असतात आणि ते त्यांच्या मुखाने ते पद घोषित करतात आणि ते पद घोषित केल्यानंतर जेव्हा त्या पदासाठी वाद निर्माण झाले. तेव्हा त्या पदाकरिता स्वतः मा. महापौरांनी स्वतः गिल्बर्ट मेन्डोसा साहेब हयांनी लागेल ते प्रयत्न केले. वकिलांच्या बाबतीत त्यांना ॲडवाईज केले गेले. तेव्हा हा विचार त्या सन्मा. सदस्यांनी केला पाहिजे असे विषय आणण्यापूर्वी आपल्याला कोणत्या पध्दतीने पद प्राप्त झाले आहे आणि ते पद प्राप्त करताना त्या पक्षांनी कोणत्या प्रकारे सहकार्य केले आहे आणि जे एक्झीस्टींग कॅबिन जे सभागृह नेते पद राष्ट्रवादी काँग्रेस पक्षापुढे आहे. त्यांच्याशी आपण सुसंवाद साधला पाहिजे. अधिकाऱ्यांना पेलवत नाही आणि अधिकाऱ्यांना झेपवत नाही म्हणून ते आपल्याकडे विषय आणून देतात. ही प्रथा चुकीची आहे. सभापती महोदय, आपण हा विचार केला पाहिजे. त्यांना

झेपवत नाही. त्यांना पेलवत नाही. त्यांना वाद वाटतो. आपण राजकीय पक्ष म्हणून सक्षम आहोत. आपला एक मोठा गट ह्या ठिकाणी आहे. आपण सत्ताधारी आहोत. आपण सक्षम आहोत. आपण मा. महापौर, उपमहापौर यांच्याकडे गेले पाहिजे आणि तो विषय प्रशासनाने हया ठिकाणी सोडवा. एखादया दालनाच्या किंवा कॅबिनच्या विषयावर चर्चा सुरु झाली. सभापती महोदय, आपण मागच्या वेळेला बोललात की, मी वेळेवर सभा घेतो. मला वेळ घालवायचा नाही तर हा वेळ कुठला जातोय. एखादे दालन त्यांना दिल्याने ते विरोधी पक्षनेते पद कोणते वेळी विकासाची कामे ते करु शकले नाही. त्यांना ॲन्टी चेंबर नसल्यामुळे आणि दालन दिल्यामुळे त्यांनी कोणती विकासाची कामे केली आहेत. अशा पध्दतीचा विचार आपण केला पाहिजे आपण ज्या गोष्टीमध्ये चर्चा करतो आणि त्या चर्चेला पूर्णपणे फायदा आमचे सहयोगी पक्ष त्यांनी कधी विरोधाची भूमिका बजावली नाही. हे विरोधी पक्ष म्हणून आपल्यासमोर बसले आहे. त्यांना आपण चर्चेसाठी विषय देतो. अधिका-यांना विषय झेपवत नाही. अधिकारी सांगतात की, वाद आहे तर तो वाद होउ शकतो. आपल्याकडे सक्षम पावर आहे. आपण सभापती असल्यामुळे सभापती हया नात्याने त्यांनी तो विषय सभागृहामध्ये आणला म्हणजे त्याला भेटेल हा विषय नाही. सभापती एवढा सक्षम आहात. आपण अशी सभा मा. महापौरांच्या दालनामध्ये लावू शकतो. त्यांना विनंती करु शकतो की, सभा बोलवा आणि निर्णय घ्यावा, असे किती प्रश्न आहेत. जे अधिका-यांना पेलवत नाही, झेपवत नाही. त्यांनी त्या कामामध्ये दिरंगाईपण केलेला आहे. मला अधिका-यांविषयी टिका टिपणी करायची नाही. त्यांच्यामध्ये काही उणिवा आहेत. त्या उणिवा आपण येथे आणतो का? त्या उणिवा आम्ही सोडवितो. मी मघाशी पहिल्या सभेत बोललो. फॉलेशन गव्हर्नमेन्ट आहे. आपण विषय घेताना जरूर त्याप्रमाणे संपर्क साधा आणि संपर्क साधूनही जर त्यांनी तुमच्याकडे लक्ष दिले नाही व तुमच्या मताशी राहिले नाही तर आपण जरुर विषय घेउ शकता आणि तुम्हाला पूर्ण अधिकार आहे. आपण कोणते विषय घेता आणि असे विषय घेतल्यावर चर्चा होते आणि तुम्ही तुमच्या पहिल्या सभेत बाललात की, मला वेळेचे महत्व आहे आणि त्यावेळेचे महत्व तुम्ही बघितले पाहिजे. ह्या वेळेच्या महत्वामध्ये हे महत्वाचे विषय नाही आणि विरोधी पक्षाचे दालन दिल्यानंतर ॲन्टी चेंबर दिल्यानंतर त्या ठिकाणी कामे चांगली होतील किंवा त्या ठिकाणी काम चांगले होत नाही. हा विषय सभापती महोदय होउ शकत नाही. आपण हयाची नोंद घ्यावी आणि हया विषयाला पूर्णविराम दयावा, अशी मी आपल्याला विनंती करतो. धन्यवाद.

**मिलन म्हात्रे:-**

सभापती महोदय, हा जो विषय आहे. तसे बघायला गेले तर ॲन्टी चेंबर हा तक्रार सगळयात पहिला नगरपालिकेचे मुख्याधिकारी संपतराव शिंदे हयांनी आणला. पारदर्शक सरकार चालवायचे असेल तर एक खिडकी योजना, दहा खिडकी योजनांच्या गोष्टी करतो. मला वाटत नाही का कुठल्या पदाधिका-याला ॲन्टी चेंबरची गरज असेल आणि ती नसावी. सरळ सुस्पष्ट असे नगरसेवकांना सांगायचे आहे, जनतेला सांगायचे आहे, मतदाराला सांगायचे किंवा अधिका-यांना सांगायचे तर दालनाची काही गरज नाही. ॲन्टी चेंबरची काही गरज नाही. माझा सांगायचा दृष्टिकोन असा आहे की, ज्या वेळेला आमचे विरोधी गट नेते आहेत. त्यांना जेव्हा दालन देण्याचा प्रश्न आला तेव्हा हया महानगरपालिकेच्या अधिनियमाचे गोष्टी आम्हाला शिवमूर्ती नाईक साहबांना सांगितले की, हयाच्यामध्ये तरतुद नाही. आता मला एक सांगा आपला एवढा एक तास गेला. एखादया सभागृहाच्या किंवा एखादया अधिका-यांच्या दालनामध्ये ॲन्टी चेंबर बनविणे हे नियममध्य तरतुद आहे का? तर नाही आहे आणि जर त्याउपर करायचे असेल तर हा वाद बरेच दिवसापासून पेन्डींग आहे. मी म्हणतो जे मधले दालन त्याचा काही विनियोग तुम्ही हया लोकांकरिता करु नये. सरळ आतमध्ये पार्टीशन बांधून त्यामध्ये बसावे आणि तो वाद मिटवून टाकावा. एक टेबल आणि दोन-तीन खुर्च्या त्याच कॅबिनमध्ये दया आणि हा वाद मिटवून टाका. खर बघायला गेले तर काय अर्थ नाही. हा बेसलेस विषय आहे. उगीच येथे आणून त्याचा वाद निर्माण झाला आहे. हया शहराचे पूर्णपणे नेतृत्व करता महत्वाचे पद सभागृह नेता आणि विरोधी पक्ष नेता जर आपसात भांडायला लागले तर खरी आमची भांडायची भूमिका आहे. तर आम्ही काय करायचे. आम्ही प्रत्येक विषयावर मग दहा पटीने भांडले पाहिजे. हा केवळ बसण्यावरुन केवळ शुल्लक वाद आहे. हा जो ठराव कोणी आणला आहे. तर खरी गोष्ट त्याला काही गरजच नाही. ॲन्टी चेंबर हा विषय नाही आहे. तुम्ही रुलिंग द्या. हयाच्यामध्ये आहे का? आम्ही मंत्रालयात बघतो. मंत्री बाजूच्या छोटया कॅबिनमध्ये बसलेले असतात आणि तिथे निर्णय घेतात. त्यांना ॲन्टी चेंबर नाही आहे.

**मा. सभापती:-**

एकाला दिली म्हणून दुस-याला पाहिजे असे आहे. माझ्यापासून सर्वांचे कॅबिन काढा. मी तयार आहे. पण एकालाही देऊ नका असा विषय आहे.

**मिलन म्हात्रे:-**

ॲन्टी चेंबरमुळे आपल्याला खर्चाचा भार एवढा आहे. आम्ही ॲन्टी चेंबरचे बघतो. ए.सी. चालू असतात, लाईट चालू असतात. हा सगळा भार आपल्यावर पडत असतो. कार्यालयाच्या बाहेरसुध्दा आणि आतमध्येसुध्दा हयाच्यावर कोणाचे लक्ष नसते. काही ॲन्टी चेंबर वेगळे दयायची गरज नाही. आतल्या आत तुम्ही पार्टीशन करुन बसायची आसन व्यवस्था करा आणि हा विषय संपून टाका.

**मोहन पाटील:-**

कृपया आपण हा विषय विषयपटलावरुन काढून टाकावा आणि पुढचा विषय घ्यावा.

**चंद्रकांत वैती:-**

मोहन पाटील साहेब आपण फार पोटतिडिकीने बोललात आणि आम्ही गप्प बसतो. हयाचा अर्थ असा होत नाही की, आम्ही बोलणार नाही. आपल्या भावना आम्ही समजू शकतो. हा विषय आपण मांडू शकतो. परंतु, जेव्हा विरोधी पक्ष नेते हे वारंवार हया विषयाची मागणी करत असतात. स्थायी समिती सभागृह हे निर्णय घेणारे सभागृह आहे आणि सभागृहाकडे आणले तर काय चुकीचे झाले असे समजू नका आणि सभागृहात आल्यावर हया विषयावर निर्णय का होउ नये. सभागृह नेते हे फार मोठे त्या ॲन्टी चेंबरचा उपयोग करणार आहेत. त्या दोघांना त्यांच्यात का बसता येणार नाही? का पार्टीशन टाकता येणार नाही. ते मागणी करतात आणि तुम्ही सांगता की, असे करता येणार नाही असे तुम्ही सांगू नका. हा विषय आज सभागृहापुढे आला आहे आणि हया विषयावर निर्णय झाला पाहिजे या मताशी मी आहे.

**मोहन पाटील:-**

कोणत्याही भाष्यावर माझे सहकारी सन्मा. सदस्य चंद्रकांत वैतीजी आवाज हे कमी करुन बोला. सभापती महोदयांना मोठे आवाज ऐकायची सवय आहे. आम्हाला मोठे आवाज ऐकायची सवय नाही आणि सन्मा. सदस्य बोलतात बेसलेस विषय बोलताना ते बालेले की, बेसलेस विषय हे शब्द तुमच्या कानाला खुपसले नाही. कशाला तुमच्या बेसलेस विषयावर आमची बेसलेसपणा थकवून घेता. काय आवश्यकता आहे. तुम्ही बेसलेस विषय घेउ शकाल. हया कॉंग्रेसबरोबर हे राष्ट्रवादी पक्ष बसतोय आणि त्यांनी घेतलेले विषय हे आमचे विषय आहेत. तुम्ही आम्हाला बोलता आम्ही ते सहन करु ऐकून घेऊ आणि तुम्हाला बेसलेस बोलल्यावर ते आम्हाला लागते. ते आपण व्यवस्थित ऐकून घ्या आणि त्यांना तुम्ही व्यवस्थित उत्तर दया. आज तुम्ही हे शब्द बोलून मागचा वाद निर्माण केला. सन्मा. सदस्य धनराज अग्रवालजी बोलले, मिलन म्हात्रेजी बोलले. विषयाचे निर्णय घ्यायला पाहिजे. म्हणजे त्यांना पेलवत नाही. त्यांना झेपवत नाही. म्हणून तुम्ही निर्णय घेता. मग आपल्याला निर्णय घ्यायचे. विषय आपण कोणते घेऊ. कोणते विषय आणू. मग सभापती पद जेव्हा आपल्या अखत्यारिमध्ये असेल म्हणून कोणतेही विषय आणायचे. सन्मा. सदस्य लिओ कोलासोजींना आपण संपर्क साधला का? मा. महापौरांना जाऊन भेटलात का? आणि उच्च आवाजात बोलायचे असेल तर सभापती महोदयांना तुम्ही सांगा. आम्ही उच्च आवाजात ऐकण्याच्या मनःस्थितीत नाही आहे. वैतीजी आपण परममित्र आहात. आम्ही आपल्याला आदरणीय मानतो. आम्ही बोलतो म्हणजे आम्ही काही बोलत नाही. आम्ही सभागृहामध्ये आमचे भान ठेवून बोलतोय. आम्ही जे बोलतोय ते सभागृहामध्ये टिपण केले जाते. त्याची आम्हाला जाण आहे. तेव्हा तुमची तोफ जी तुम्ही डागता ती सहकारी पक्षावर डागण्यापेक्षा दुसरे सहकारी पक्ष आहेत. ते कोणते शब्द वापरतात आणि असे शब्द वापरण्या इतपत हा शब्द आला कसा. मी आपल्याला विनंती केली. आपण ह्या विषयाला सभागृहात पूर्ण विराम द्या. हा विषय होउ शकत नाही आणि असे विषय येउ शकत नाही. सन्मा. सदस्य वैतीजी आपण कोणते विषय आणले पाहिजे की, ज्या विषयाने शहराचा विकास होत असेल आणि निर्ण य घेण्याची ताकद असेल म्हणून आपण घेतो. आता हा एक विषय ह्या इतिवृत्तांतात आला अनुदानाबाबत, एका संस्थेला आपण दोन लाख रूपये दिले. ते आपण आयुक्तांना का बोललो नाही. ते आपण आयुक्त साहेबांकडे का घेउन गेलो नाही. आयुक्त महोदय हा तुमच्या पावरमध्ये दोन लाखाचा विषय आहे. तुम्ही दहा लाखाच्या आतमध्ये अनुदान देउ शकता. हा पॉलिसी मॅटर विषय आहे. आपण ह्यापुढे शैक्षणिक संस्थाना अनुदान देत आहोत आणि त्याच्या व्यतिरिक्त आपण हे अनुदान संस्थेला दिले. मग तुम्ही कोणते

विषय घेतले म्हणून तुम्ही टिका टिपणी करत नाही. आणि आपण टिका टिपणी करायचे नाही. हा कारभार चांगला स्वच्छ, पारदर्शक आणि सर्व नगरसेवकांना, अधिकाऱ्यांना बरोबर घेउन चालायचे आहे. एखादा विषय का घेतला. जर आयुक्त महोदयांचा विषय होता आणि शासनाने त्याला मान्यता दिलेली आहे आणि शासनाने त्याला मान्यता दिली त्याला तुमची आवश्यकता नाही तो विषय घ्यायचा. तो विषय त्यांनी दिला आहे. दोन लाख रूपये त्यांनी द्यावे आणि जेव्हा तुम्ही तो विषय घेता. तर हा पॉलिसी मॅटर आहे आणि पॉलिसी मॅटरचा विषय हा स्थायी समितीपुढे येउ शकत नाही. कारण शैक्षणिक अनुदानाला आपण तो पैसा दिलेला आहे. सन्मा. उपमहापौर साहेब मा. महासभेत बऱ्याच वेळेला बोलले आहे की आपण ह्या शैक्षणिक संस्थांना अनुदान देताना विचार करावा लागेल आणि तो विचार आपण केला पाहिजे. अशा पद्धतीची तुमच्या समिती समोर गोष्ट आलेली आहे. परंतू आपण एक विषय आणता. आम्ही आपल्या बरोबर आहोत. आम्हाला आपल्याबरोबर काम करण्याची आवड आहे आणि आम्ही काम करू. चांगल्या पद्धतीने काम करू. जे मी माझ्या कारकीर्दीमध्ये काम करू शकलो नसेल जर एखाद्या वेळी काम करायचे राहिले असले तर त्याच्या ही अधिक पटीने काम करण्यासाठी तुम्हाला आम्ही सहकार्य देउ आणि देत राहू आणि त्यात कोणतीही बाधा येउ दे. वैयक्तिक स्वार्थ किंवा आणखीन कुठलेही स्वार्थ असू दे. ते बाजूला फेकून देउ आणि तुमच्या बाजूने खांद्याला खांदा लावून आम्ही काम करू. परंतू असे कोणतेही विषय घेताना आम्ही तुम्हाला विनंती केली. आम्ही हे बोललो नाही की तुम्ही करू नका आम्ही विनंतीपुर्वक बोलतोय. आदरणीय सभागृह नेत्यांनी पत्र सभापती महोदयांना दिलेले आहे आणि ते पत्रही आम्ही सुपूर्त केले आहे. आम्ही असे बोललो तुम्ही येथे पूर्ण विराम द्या. आणि तो विषय मा. महापौरांच्या सभेत घेउन जा आणि करा. निर्णय घेत नाही आणि निर्णय द्यायला आमच्याकडे अधिकार आहेत. पण कोणते अधिकार आपण वापरावे. जसे उद्या सन्मा. सदस्यांनी बोलले तुमच्या अखत्यारिमध्ये तुम्ही आम्हाला द्या ना. किती खर्च किती दालनासाठी बजेटमध्ये केला पाहिजे. कोणाला किती अँटीचेंबर दिल्या पाहिजेत. पहिल्यापासून आपले सन्मा. सदस्य आमचे सहकारी मित्र म्हात्रेजी बोलतात आम्ही त्यांना सामोपचाराने सांगितले जर एखादा राजगाडा या शहरामध्ये चालवायाचा असेल तर साहेब आपण कायद्याचा कीस काढू नका. सन्मा. मिलन म्हात्रेजींनी आम्हीला काही गोष्टीत बरेच ॲग्जेसमेंट करून घेतले गाडयांच्या बाबतीत, दालनाच्या बाबतीत, येथे मोठ्या मनाचे मोठया दिलाचे सदस्य ह्या ठिकाणी आहेत. शहराच्या विकासासाठी वेळ आली तर कुठले पक्ष बघत नाही. वेळ आली तर धनराजजी ही पक्ष बघत नाही. आम्ही देखील पक्ष बघत नाही. परंतू एखाद्या विषयामध्ये आम्ही आपल्याला पोटतिडकीने बोललो तो विषय आपण विषयपटलावर घेतला. घेउ शकत नाही हा कायदा आहे आणि घेउ शकतो तो ही कायदा आपण आम्हाला दाखवा. तुम्ही कोणत्या कलमाखाली हा विषय घेतला ते दाखवा. त्या विषयाला बजेटची तरतूद आहे ते ही आपण आम्हाला दाखवा. आम्ही मान्य करू. तुम्ही दिलेला शब्द हा आमचा शब्द आहे ह्या शहरामध्ये. तुम्ही घेतलेला विषय हा आमचा विषय आहे. एखाद्याने जर का बेसलेस विषय म्हणून बोलले तर तो आम्हाला लागतो. तुम्ही कितपत लावून घेता हा तुमचा विषय आहे. पण तो विषय आमचा आहे. आमचे मित्र जरी असले तरी त्यांनी बेसलेस बोलू नये अशी आमची अपेक्षा आहे. म्हणून मी तुम्हाला आता ही विनंती करतो कृपया ह्या विषयाला आपण फुलस्टॉप द्यावा. ह्या विषयावर चर्चा करू नये. अशी माझी विनंती आहे.

**चंद्रकांत वैती :-**

मोहन पाटील साहेब खूप बोललात आपण मनापासून बोललात, सभापतींनी हा विषय का घेतला येथून तुम्ही सुरूवात केली. तुम्ही सभापती म्हणून गेल्या आठ-नउ टिम वेगवेगळया खात्याचे सभापती म्हणून काम केले आहे. कामाचा अनुभव आपल्याला जास्त आहे. त्याचा अर्थ असा होत नाही सभागृहापुढे विषय आला. त्याचे गांभीर्य तुम्ही लक्षात घ्या. विषय आला आहे आणि ह्या विषयावर आपण चर्चा केली पाहिजे. ह्या विषयावर आपल्याला काय पर्याय शोधता येईल म्हणून तो विषय आला आहे. मग आजच त्याच्यावर निर्णय करा आणि तुम्ही आजच रूलिंग द्या असा विषय नाही आहे. पण ह्याच्यामध्ये आपल्याला मा. महापौरांकडे कुठला विषय घेउन जात येईल. ह्याला दोन दालने करायची की दोन्ही बाजूने दरवाजे करायचे. आपल्याला मा. महापौरांकडे बसायचे आहे, चर्चा करायची आहे. परंतू वारंवार विरोधी पक्षनेते तुमच्या पर्यंत पोहचले आपण सभापती असताना आणि मी गटनेता असल्यामुळे वारंवार मला सांगितले जाते तसेच सभापतींना सांगितले जाते. ते काल सभापती ह्यांच्या दालनामध्ये येउन गेले आणि म्हणाले माझ्या अँटी चेंबरबाबत विषय घेतला आहे. तर तो झाला पाहिजे.

हा विषय आणला ह्या विषयावर निर्णय काय घ्यायचा आहे हे सभागृहाने ठरवायचे आहे. त्याच्यामध्ये म्युचिअल अंडरस्टँडिंगमध्ये मार्ग ही काढायचा आहे. परंतु त्याच्या अर्थ असा होत नाही की हा विषय येथे संपूण टाका असे होत नाही. तुमची काम करण्याची पद्धत वेगळी होती. तुमच्या मागे कामाचा फार मोठा अनुभव आहे. त्याचा अर्थ असा होत नाही की, बाकी कोणाला काय कळत नाही. अधिकाऱ्यांना पेलवत नाही. म्हणजे अधिकारी स्वतःच्या अखत्यारिमध्ये करु शकतात का? उदया जर अधिकाऱ्यांनी काही केले तर त्याला बोलणारे कोणी नाही असे तुम्हाला बोलायचे आहे का? आपणाला हया विषयावर चर्चा करायची आहे. ती आपण करु. परंतु, त्याचा अर्थ असा होत नाही की, तुम्ही सांगता की, हा विषय आताच कसा सभागृहापुढे विषय आल्याशिवाय कुठल्याही विषयाला तोंड फुटत नाही असा आमचा अनुभव आहे. मा. सभापती साहेबांना विनंती करतो की, हया विषयात आपण मा. महापौरांशी चर्चा करावी आणि योग्य तो निर्णय घ्यावा.

**मा. सभापती:-**

हा विषय मा. आयुक्त साहेबांनी स्थायी समितीसमोर आणलेला आहे. त्यांच्यासमोर बसून चर्चा करुन नंतर पुन्हा हा विषय समितीसमोर आणण्यात येईल.

**रिटा शाहः-**

सभापती साहेबांनी हयाच्यावर चांगली रुलिंग दिलेली आहे. हा विषय कमिशनर साहेबांनी आपल्यापुढे आणलेला आहे आणि ते कायदयात बसेल म्हणून त्यांनी आमच्या समोर विषय आणलेला आहे. हे देखील आपण ग्राहय धरावे. कारण कमिशनर साहेबांनी एखादा विषय विषयपटलावर आणला. त्याचा अर्थ असा झाली ते कायदेशीर आहे आणि कायदेशीर विषय आहे म्हणून आपल्यासमोर आणला आहे असे मानून घ्यावे. कायदेशीर आहे का नाही ती नंतरची गोष्ट आहे. पण त्यांनी आणला आहे म्हणून कायदेशीर आह असे आपल्याला मानावे लागेल आणि साहेब बोलतात तसे आपण पुढच्या सभेत आणू. मला असे वाटते की, हे अँटी चेंबर आणि चेंबर कुठली ही लोकल बॉडी निवडुन आल्यानंतर त्यांना चेंबर आणि ॲन्टी चेंबर लागते. पण जसे मिलन म्हात्रेनी सांगितले पारदर्शक आपल्याकडे शासन चालवावे लागेल आणि चालवायला पाहिजे. या मताशी मी सहमत आहे की, आपल्याला ॲन्टी चेंबर मिळाले तरच विरोधी पक्ष नेते, सभागृह नेते किंवा अन्य कुठलेही नेते म्हणून काम करु शकतो. ह्या छोटयाशा गोष्टीसाठी आपण एवढा मोठा वाद घातला आणि आपला एवढा किंमती समय बरबाद केला तर माझी अशी विनंती आहे की, असला विषय येथे मी मोहन पाटील किंवा अन्य कोणाची बाजू घेत नाही. हा विषय आपल्या अखत्यारीचा विषय आहे. शासन आणि समिती हया दोघांच्या समन्वयचा विषय आहे. आयुक्त साहेब, उपआयुक्त साहेब, महापौर साहेब, उपमहापौर साहेब, गटनेते, सभागृह नेते आणि विरोधी पक्षनेते हया सर्वांनी एकत्र मिळून, बसून हया विषयावर निर्णय घ्यावा आणि सभागृहापुढे असले विषय आणायचे नाही अशी मी विनंती करते.

**मोहन पाटीलः-**

सभापती महोदयांच्या परवानगीने बालतोय, खूप बोललात हा शब्द सन्मा. वैतीजी आपण बोलू नये.

**चंद्रकांत वैती:-**

मंजूर.

**आसिफ शेखः-**

सन्मा. सभापती साहेब, आपले सभागृहातील सभागृह नेते लिओजी कोलासो हयांचे हया ठिकाणी एक पत्र आले.

**मा. सभापती:-**

मला सर्व पत्र मिळाले आहे.

**कल्याण केळकर(मा.उपआयुक्त सो.) :-**

मा. पिठासीन अधिकारी हयांनी रुलिंग दिल्यानंतर विषय संपत असतो. विषय वाढवायचा नसतो.

**आसिफ शेखः-**

हा विषय आम्ही वाढवत नाही तर प्रशासनाने विषय वाढवलेला आहे. सभागृहाचे औचित्य साधले पाहिजे. सभागृहाचे कामकाज नितीनियमाने चालले पाहिजे. संसदीय कामकाजाप्रमाणे सभागृह चालले पाहिजे. हया मताशी आम्ही आहोत आणि त्याचे तंतोतंत पालन आम्ही हया ठिकाणी करत

आहोत. मी प्रत्येक वेळी सांगतो जे अधिकार स्थायी समितीचे आहेत. ते अधिकार स्थायी समितीने वापरले पाहिजे. जे मा. महासभेचे अधिकार आहेत. ते मा. महासभेने वापरले पाहिजेत. हया विषयाचा सोक्षमोक्ष लागला पाहिजे. मा. सभापती, मा. महापौर, मा. उपमहापौर, मा.सभागृह नेते, मा. विरोधी पक्ष नेते हया सर्वांनी हया विषयावर चर्चा करावी व पुढच्या वेळेला हा विषय सभागृहापुढे येता कामा नये आपण सर्वांना घेउन उपआयुक्त साहेबांबरोबर हया विषयावर सामोपचाराने चर्चा करावी.

**प्रकरण क्र. १५२:-**

मा. विरोधी पक्ष नेते यांना अँटी केबिन उपलब्ध करुन देण बाबत निर्णय घेणे.

**ठराव क्र. १३२ :-**

imara¹Baa[-Mdr mahanagarpailaka mau#ya kayaa-laya [maart¸ ivaraoQaI pxa naoto yaaMcyaa krIta svatM~ dalana AsaUna %yaaMcyaa dalanaa SaojaarI saBaagaRh naoto yaaMcaI AÐTI k^ibana Aaho. ivaraoQaI pxa naoto maa.EaI. prSaUrama paTIla yaaMnaI AÐTI caoMbar caI maagaNaI kolaolaI Aaho. %yaakrIta laagaNaarI jaagaa saBaagaRh naoto yaaMcyaa AÐTI caoMbar cao daona Baaga k$na %yaa maQaIla ek Baaga AÐTI caoMbar krIta ]plaQba k$na doNyaacaI ivanaMtI kolaolaI Aaho.

varIla p`maaNao AÐTI caoMbar tyaar k$na imaLNaobaabat maa. ivaraoQaI pxa naoto vaarMvaar ivacaarNaa krIt AsaUna pazpUravaa krIt Aahot. yaabaabat maa.saBaaptI sqaayaI saimatI¸ maa.mahapaOr¸ maa.saBaagaRh naoto va maa.ivaraoQaI pxa naoto¸ maa.Aayau@t yaaMnaI maa. mahapaOrakDo baOzk Gao}na yaabaabat inaNa-ya GaoNyaat yaavaa.

**सुचक :- श्री. आसिफ शेख.** **अनुमोदन :- श्रीम. रिटा शाह**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १५३ चे वाचन केले.)

**मिलन म्हात्रे:-**

सभापती महोदय, प्रकरण क्र. १५३ मध्ये श्री. माळी हयांची सचिव विभागाकडे विशेष कार्यकारी म्हणून नियुक्ती करण्याकरिता हा विषय आणलेला आहे. या संपूर्ण विषयाच्या गोषवा-यामध्ये श्री. माळी हयांनी आतापर्यंत महानगरपालिकेला काय मदत केली आहे आणि काय काय सहकार्य करुन आपला आलेख कसा चढेल असा प्रयत्न आपल्या हया गोषव–यामध्ये दिसून येत आहे. परंतु, माळी हयांची नेमणूक झाल्यानंतर आम्हाला ही असे वाटले होते की, नवीन आपल्या प्रशासनाच्या कार्यामध्ये कामकाजामध्ये बराचसा असा फरक पडेल असे मला स्वतःला वाटले होते. परिणामी या स्थायी समितीसमोर सर्व सदस्यांना माहिती असेल की, हे एक निवृत्त अधिकारी आहेत, अनुभवी आहेत. आमच्यापेक्षा वयाने जास्त आहेत. तर अनुभवानेही जास्त असतील. परंतु, हयांच्या कार्यकालामध्येच एका वेळेला असा प्रस्ताव आला होता. लिओ कोलासो आणि शशिकांत शहा गैरहजर असताना त्यांच्या नावाने ठराव पास केला गेला. स्वाक्ष-या झाल्या होत्या. विषयपत्रिकेवर त्यांची नावे आली होती. त्यानंतर बजेटमध्ये तरतूद नसताना दशोरेंच्या सहीचे त्यांना किती लाखाचे पावर्स आहेत. ते त्यांनाही माहिती आहे. माळी साहेबांना ही माहिती आहे. चाळीस लाखाचा प्रस्ताव स्थायी समितीसमोर आणला होता. त्यानंतर मा. महासभेपुढे जवळजवळ सव्वाचार करोड रुपयाचा प्रस्ताव आला. ज्याची

बजेटमध्ये तरतुद नाही आणि असे वादग्रस्त प्रस्ताव, विषय आणि प्रकरणे यांच्या कारकिर्दीमध्ये आली. आपण हया गोषवा-यानंसार त्यांची फेरनियुक्तीला परवानगी मागता आहात. परंतु, हे असे मोठमोठया चुका जर वारंवार होत राहिल्या तर आम्ही महानगरपालिकेचे नगरसेवक हया नात्याने थोडे नवखे आहोत. आपल्याला मार्गदर्शन करणे गरजेचे आहे. पण आपण ही सभापती आहात. नवीन आपल्याला कार्यक्रम चालवायचे आहे. सभा चालवायची आहे. सभाशास्त्रानुसार सर्व व्यवस्थित चालवायचे आहे. ह्या चुका झाल्या असूनसुध्दा फक्त एकतर्फी त्यांच्याकडून आले आहे आणि बहुतेक हा गोषवारा त्यांच्याकडून बनवून देण्यात आलेला आहे असे मला वाटते. हयात सकारात्मक बाजू दिली आहे. जर नकारात्मक बाजू दिली असती तर मला बरे वाटले असते. कारण आपल्याला निर्णय देताना बरे वाटले असते. फक्त एकतर्फी बाजू दिली आहे. दुसरी बाजू मी सभागृहापुढे मांडली आहे. हा विषय मंजूर करायच्या अगोदर मी जे बोललो त्याच्यावर श्री. माळी हयांनी खुलासा करावा. त्यानंतर सभापतीनी रुलिंग दयावे व मंजूर किंवा नामंजुर करावे.

**कल्याण केळकर (मा.उपआयुक्त सो.):**

सन्मा. सदस्य श्री. मिलनजी म्हात्रे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ खाली हा विषय सभागृहासमोर प्रशासनाच्या वतीने आणण्यात आला. यामध्ये पाच महिन्याच्या कालावधीकरिता नेमणूक करण्याचे अधिकार करण्याकरिता स्थायी समिती सक्षम आहे. त्यानुसार हा विषय आला. आपण यापूर्वी काय घडले? या बाबत आपण या सभागृहापुढे निशद केले. काम करणा-या प्रत्येक व्यक्तीकडून चुका होत असतात. त्या अनावधनाने होतात. चुका कोणीही जाणीवपूर्वक करत नसतात. अनावधनाने चुका केल्या त्या चुका झाल्या असतील तर त्या चुका सुधारण्याची संधी त्या व्यक्तीला असायला पाहिजे आणि त्यांच्याकडून अशी जर चुक झाली असेल तर तो सभागृहासमोर प्रस्ताव आणणे हे प्रशासनाचे काम असते आणि प्रशासनाने जर प्रस्ताव आणला आणि जर नजरचुकीने चुक त्यामध्ये झाली असेल तर सभागृहाने मोठेपणाने त्याला संधी देणे व क्षमापित करणे हे मोठे धोरण सभागृहाचे असावे आणि जो प्रस्ताव आलेला आहे त्यामध्ये त्यांचा असा कोणताही हेतू नव्हता की, जे गैरहजर आहेत त्यांचे नाव टाकावे. असा त्यांचा वैयक्तिक हेतू नव्हता आणि त्यांना जो कामाचा अनुभव आहे. तसेच, आपल्याला भविष्यात शिक्षण मंडळाची स्थापना करावयाची आहे. शिक्षण मंडळाची स्थापना आणि इतर प्राधिकरणाची स्थापना करायची आहे. प्रभाग समितीची निवडणुक या संबंधी त्यांच्या कार्याचा अनुभव लक्षात घेता त्यांना पाच महिन्याकरिता मुदत वाढीचा प्रस्ताव सभागृहापुढे घेण्यात येत आहे. कृपया त्यावर सभागृहाने निर्णय घ्यावा.

**मिलन म्हात्रेः-**

केळकर साहेब, मी जे महत्वाचे बोललो आहे, त्याचे बोला. अनावधनाने चुका होतात ते मला पण माहिती आहे. आदल्या दिवशी स्थायी समितीमध्ये चाळीस लाखाचा प्रस्ताव आला होता. दुस-या दिवशी मा. महासभेला सव्वा चार कोटीचा प्रस्ताव आला होता. एक चार कोटी पासष्ट लाखाचा प्रस्ताव बजेटमध्ये तरतुद नसताना आला कसा? प्रशासनाकडे किंवा सचिवांकडे एखादया खात्याने प्रस्ताव पाठविला. दशोरेनी तुमच्याकडे प्रस्ताव पाठविला. पण त्यांच्यामध्ये बजेटची तरतुद किती? ते तुम्हाला बघता येत नाही. त्याची तुमच्याकडे कॉपी नाही. त्याचे व्यय किती झाले आहे? अव्यय किती झाले आहे? जमा किती आहे? खर्च किती आहे? हे बघायचे काम कुणाचे आहे. हरेश पाटील किंवा माळी यांना माझा व्यक्तिगत विरोध नाही. हे आम्हाला टांगणीला लावतील. कारण टी.एम.सी.ला सगळे नगरसेवकच जेलमध्ये गेले आहेत. एकही अधिकारी जेलमध्ये गेला नाही. मी जे बोललो ते अनावधानाने तुमची चुक झाली. स्थायी समितीत चाळीस लाखाचा ठराव, गोषवारा चुकीचा झाला. माफ केले व त्यावर आम्ही काही बोललो नाही. त्या अधिका-यांनी सहया केल्या आहेत. तो अधिकारी सक्षम आहे का? तुम्ही सही केली आहे. तुमच्याकडे पावर्स काय आहेत. खर्चाचा लेखाजोखा किती पावर्स दिले आहेत. आयुक्त साहेबांनी जर दहा लाखाच्यावर मंजुर केले तर बोंबाबोंब होते. एखादा अधिकारी त्याचे पावर नसताना एवढे एवढे लाखाचे विषय आणतो. हे बघायचे काम कुणाचे? सचिव साहेबांनी वाचन केले. आमचे असे म्हणणे असते की, हा प्रस्ताव बरोबर आहे व नियमानुसार आणलेला आहे. असे सर्व सदस्य व सभापती महोदय समजतात. प्रशासनाने प्रस्ताव आणला म्हणजे हयामध्ये आपल्याला धोका नाही. आणि लाईटली आपण होय किंवा नाही असे उत्तर देतो. पण हया खाली सुरुंग केलेले आहे. वरुन काहीच दिसत नाही. तरी जेव्हा ते सुरुंग फुटतात तेव्हा त्याच्या आवाजाने कानठळया बसतात आणि ते आपल्याला सहन होत नाही. तेव्हा आम्ही

केलेल्या चुका त्याला कोणी माफी किंवा आपण जे आता बोललात क्षमापित वगैरे कोणी करत नाही. कारण हयाला आम्हाला पुढे मंजु-या दयाव्या लागतात. जर काल-परवाचे हे विषय मंजुर झाले असते व त्या बजेटमध्ये तरतुद नसती तर ८६ नुसार आयुक्त साहेब व आम्हीदेखील बाराच्या भावात गेलो असतो. मी हे सांगतोय जे वारंवार चुका होताहेत त्या आपण बघा. मी म्हणत नाही त्यांना तुम्ही मुदतवाढ देउ नका. त्यांच्या अनुभवाचा आपण पुरेपुर उपयोग करून घ्या.

**धनराज अग्रवाल :-**

सभापती महोदय, मिलन म्हात्रेजींनी जो गलतीया बताई I मैं आपसे यह पुँछना चाहता हूँ की जो भी अधिकारी आपको यहा पर प्रस्ताव देते है I वह सचिव साहब को पुँछ के देते है या जो प्रस्ताव देते है वह सचिव साहब अपने आप उनको दे देते है या उसका कोई स्टडी नही होता है I इसका नियम क्या है ?

**प्र. सचिव :-**

प्रत्येक विभागाकडून जो प्रस्ताव येतो त्याचा सचिव कार्यालयाशी काही एक संबंध नसतो. प्रत्येक प्रस्ताव लेखा विभाग आणि आयुक्त साहेब यांच्या मंजूरीने आल्यानंतर तो प्रस्ताव जसा असतो तसाच तो सभेपुढे ठेवणे हे सचिवाचे काम आहे. प्रस्ताव बरोबर आहे, तरतुद आहे की नाही हयाचा सचिवाशी संबंध येत नाही. प्रस्ताव येतानाच तो त्या विभागाने तरतुद बघून पाठवायचा असतो.

**धनराज अग्रवाल :-**

प्रस्ताव आणताना लेखा विभाग बघत नाही का?

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही असे बोलून चालतच नाही. एक लक्षात ठेवा ज्या अधिका-यांनी चुकीचे दिलेले आहे. पहिली गोष्ट तर त्या ठरावात त्यांनी त्याचे म्हणणे सर्व बरोबर मांडले आहे की नाही. समजा एखादा अधिकारी आहे त्याने जाणूनबुजून सभापती साहेबांविरूद्ध कटकारस्थान केले आणि अडचणीचा मुद्दा आणला. तर तुमच्याकडून तुम्ही जसाच्या तसा तुम्ही सप्लाय करणार का?

**प्र. सचिव :-**

संबंधित विषय सभापती ह्यांच्याकडे ठेवला जातो.

**मिलन म्हात्रे :-**

प्रश्न तसा नाही आहे. प्रशासन म्हणून मी म्हणतोय. शिवमुर्ती नाईक साहेब तुम्ही मेहेरबानी करून ह्याच्यामध्ये दखलअंदाजी करू नका कारण तुमच्याकडे प्रशासनाचा भाग नाही आहे. त्यांना मला त्यांच्याकडून उत्तर देउ दे. उगीच ते तुमचा वापर करता तुम्ही मध्ये मध्ये बोलू नका. बोलायचे असेल तर तो चार्ज घ्या आणि मग बोला. सभापती साहेब आहेत आणि त्यांना एखाद्या वेळी कळले नाही आणि अनावधानाने मुद्दामहून प्लानिंग करून एखादा ठराव आणला, सभापती साहेबांना अडचणीत आणायला. राजकारणामुळे आणला. तुम्ही असा कॅरीफॉरवर्ड करणार का? आणला आणि दिला. तुमचे काम आहे ते बरोबर आहे की नाही बघायचे. आणला म्हणजे तुम्ही पोस्टमेनगिरी करायला आणखीन एक अधिकारी पाहिजे का? सहाय्यक पोस्टमन पाहिजे का? सचिव म्हणून तुमची संपुर्ण जबाबदारी आहे. तुमची पण प्रशासन म्हणून जबाबदारी आहे.

**नाकाडी :-**

मा. सभापती साहेब आणि सर्व उपस्थित स्थायी समिती सदस्य ह्यांना मी सांगू इच्छितो की, अर्थसंकल्पात तरतुद असल्याशिवाय कुठलाही प्रस्ताव पुढे येत नाही आहे. परवा जे झाले होते ते प्रथमदर्शनी आमच्या जवळ बजेटमध्ये प्रोव्हीजन आहे. पाणी विभागामध्ये जी बजेटमध्ये तरतुद आहे त्या तरतुदीच्या अगेन्स्टंच बजेट रजिस्टरमध्ये किंवा अजूनपर्यंत झालेली कामे अंदाजित एक कोटी पंचेचाळीस लाखाचे कामे झाली होती आणि साडेचार कोटी शिल्लक होते ते तपासूनच आम्ही हा प्रस्ताव आयुक्त साहेबांच्या मान्यतेला पाठवतो. बजेटमध्ये तरतुद नाही हे बघत नाही असे नाही.

**मिलन म्हात्रे :-**

हे बघा तुम्ही आम्हाला कनफ्युज करण्याचा प्रयत्न करू नका. मी स्पष्ट सांगतो त्या कामाची तरतुद एम.जी.पी.च्या अधिका-याने सभागृहामध्ये आश्वासन दिले तेव्हा शिवमुर्ती नाईक साहेब हे उपआयुक्त होते. आणि ते इतिवृत्तांतामध्ये रेकॉर्ड झाले आहे. तुम्ही नविन आहात जरी आपण जुनी प्रोसिडिंग वाचा. कामकाज असे साधे, सरळ, सोपे चालवायचे नाही आहे. एखाद्या महत्त्वाच्या विषयाला जुन्या प्रोसिडिंगमध्ये आपण वाचा आणि त्याच्यामध्ये नोंद झाले आहे. तुम्ही अधिका-यांना

बोलवा.  ही रक्कम मंजूर करून सभागृहामध्ये मान्य करून घेतले तर तुमची स्टेप काय आहे.  नंतर हा विषय आम्ही आणतो.  त्यांनी सभागृहात होय म्हणाले आहे मी त्या सभागृहाला त्यावेळी उपस्थित होतो.  इतिवृत्तांत माझी उपस्थिती असेल. मी त्याचा विटनेस आहे.  तुम्ही कशाला, तुम्ही दोन महिने आलेले आहात आणि तुम्हाला अगोदरचे वर्ष दिड वर्षाचे काय माहिती पडणार? आणि ते आता सहा महिने झालेले आहेत आलेले आहेत.

**चंद्रकांत वैती :-**

मा. सभापती साहेब, सन्मा. मिलन म्हात्रे यांना मी विनंती करू इच्छितो की, आपण सर्वस्व आहोत आणि एकतर तुम्ही उपआयुक्तांबद्दल जे अनुधान काढता आता ही काढले तुम्ही की तुम्हाला बोलण्याचा अधिकार नाही. महापालिकेची गाडी घेउन फिरतात महापालिकेने त्यांना चेंबर दिले आहे. उपआयुक्त म्हणून काम करतात.  मग तो संबंधित अधिकारी होउ शकत नाही का?

**मिलन म्हात्रे :-**

त्यांच्याकडुन आम्हाला वारंवार उत्तर मिळते की हा विषय आमच्याकडे नाही.  म्हणून मी बोलतोय.  आम्ही काम घेउन गेलो की ते म्हणतात की आमच्याकडे हा चार्ज नाही. मी उत्तर देउ शकत नाही.  सही देउ शकत नाही.

**शिवमुर्ती नाईक :-**

कॅबिनमध्ये बोलताना मी बोलता की माझ्याकडे हा चार्ज नाही.  पण सभागृहात बोलणे आणि कॅबिनमध्ये बोलणे ह्यात फरक आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही नोकरीवर रूजु असताना आम्हाला बोलता की हा चार्ज माझ्याकडे नाही आहे. मी ह्यांच्यावर काही निर्णय देउ शकत नाही, सही देउ शकत नाही असे आम्हाला उत्तर मिळते. उद्यापासून तसे उत्तर देउ नका.  जे येथे तुम्ही बोलता तेच तुमच्या कॅबिनमध्ये ही बोला.  तसेच त्या खात्याचे अधिकारी ही सक्षम आहेत उत्तर द्यायला.  ते देखील महानगरपालिकेची नोकरी करताहेत.

**कल्याण केळकर (मा.उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. मिलन म्हात्रेजी आपल्याला कोणाकडून उत्तर अपेक्षित आहे.

**मिलन म्हात्रे :-**

संबंधित खात्याच्या अधिका-याकडून आम्हाला उत्तर अपेक्षित आहे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम ४९ प्रकरण (२) नियम ५३ अन्वये हा विषय सभागृहापुढे आलेला आहे.  आणि आपण ह्याविषयामध्ये दोन मुद्दे उपस्थित केले. ह्यापूर्वी जेव्हा कधी सभागृहामध्ये बजेटच्या अंदाज पत्रकीय तरतुदीच्या व्यतिरिक्त काही कामे आली होती पाणी पुरवठा विभागाची आणि त्याची पाहणी सचिवांनी किंवा माळी साहेबांनी त्यावेळी स्पुटनी करून ते प्रकरण सभागृहापुढे यायला पाहिजे होते.  तसे न करता ते प्रकरण थेट सभागृहापुढे आले.  आणि त्याला सभागृहाची जबाबदारी निश्चित होते.  पण आता आपल्याकडे नव्यानेच मुख्य लेखापरिक्षक आलेले आहेत. आताच्या नविन तरतुदी नुसार प्रत्येक प्रकरण हे मुख्य लेखापरिक्षक ह्यांच्याकडेच आर्थिक तरतुदीची तपासणी झाल्यानंतरच ते सभागृहासमोर येते.यापूर्वी सभागृहासमोर काय झाले याची मला सुद्धा माहिती नाही आहे.  तर मी ह्याबाबत माहिती घेण्याचा प्रयत्न केला.  असे दोन प्रकरण सभागृहासमोर आले.  माळी साहेबांचे मत आले की लिओ कोलासो साहेब हजर नसताना त्यांची सही सभागृहात घेण्यात आली. ह्यागोष्टी माझ्या काळात किंवा ह्यांच्या काळात झालेल्या नाहीत.  त्यांना मी विचारले व त्याबाबत मी खुलासा ही केलेला आहे की काही गोष्टी अनावधनाने चुका होतात आणि यापुढे सभागृहासमोर प्रत्येक प्रकरण येताना आर्थिक तरतुद तपासूनच ते प्रकरण सभागृहासमोर येईल. सभागृहासमोर आर्थिक तरतुदीच्या व्यतिरिक्त प्रकरण कधीही येणार नाही किंवा आलेले नाही.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सभापती साहेब आपले सदस्य मिलन म्हात्रे हयांनी उपआयुक्तांबद्दल जे बोलले तर मला वाटते अशाच पद्धतीचे उत्तर उपआयुक्त साहेब तुम्ही मलासुद्धा दिलेली आहेत.  त्याच्यामुळे मला आठवत नाही की मी कुठे अपमानित झालेलो आहे. ज्या खात्याचा तुमच्याकडे चार्ज नाही.  त्या खात्यासंबंधित जर तुम्ही कुठे उत्तर दिले असेल तर त्याच्यामध्ये कोणत्या सदस्यांचा अपमान केला असे वाटत नाही. प्रश्न विशेष कार्यकारी अधिका-याची नेमणूक करणेबाबत ते गोषवा-यामध्ये ८/९/२००३

पासून आणि आज तुम्ही हा विषय सभेसमोर आणता आणि तुम्ही नेमणूक ८/९/२००३ पासून मागता तर आज सभेची तारीख आहे २३/१०/२००३. कृपया आपण ह्याचा खुलासा करावा.

**मिलन म्हात्रे :-**

ह्या सगळया चुका ह्यांनी करायच्या आणि आपण अनावधनाने मंजूर करायचे.

**दशोरे :-**

आता जे मिलन म्हात्रे साहेबांनी सांगितले की हे जे प्रस्ताव आले आहेत ते लेखा परिक्षक ह्यांची मंजूरी घेतली आहे का? तर हे सगळयांची मंजूरी घेउन आणि बजेटमध्ये तरतुद आहे म्हणून तो प्रस्ताव मा. महासभेसमोर ठेवण्यात आलेले आहे. आणि तीन कोटीची तरतुद शिल्लक होती आणि एकशे दहा पॉंईट सिक्स फोर फोटीचे बजेट होते. त्याच्यामध्ये टोटल तीन कोटीची तरतुद शिल्लक होते. त्याच्यामध्ये वेगळे काम घेण्यात आले चार टाकी घेण्यात आले आणि मेजरमेंट घेण्यात आले. त्याच्यामध्ये डिस्ट्रीब्यूशनला फक्त दोन कि.मी. घेण्यात आले आणि आम्ही जो प्रस्ताव टाकला होता त्याच्यामध्ये पंधरा कि.मी. चे वेगळे डिस्ट्रीब्यूशन आहे. ते एम.जी.पी. च्या प्रस्तावात समावेश नाही.

**मिलन म्हात्रे :-**

त्यावेळेला ठरले पाईप लाईनच्या पाण्याच्या टाक्या बनवायच्या अगोदर करतोय म्हणजे आपल्सा घरामध्ये आपण हंडे आणायचे नाही. ग्लास आणून ठेवायचे.

**दशोरे :-**

पाईप लाईन टाकायचे काम चालू आहे व साठ ते सत्तर टक्के काम चालू आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तेव्हा आपण सन्मा. ऑडीटर साहेबांनी एक कोटी चाळीस लाखाची तरतुद पाणी विभागामध्ये आहे हे सांगितले आहे व त्याची नोंद झालेली आहे. १.४० एवढा खर्च आहे तर राहिले किती?

**नाकाडी :-**

चार कोटी शिल्लक आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही जो वाद घालतोय ना साहेब तर आम्ही एवढेच सांगतोय ह्या सभागृहामध्ये जे काय निर्णय होतील ते व्यवस्थित सगळयांकरिता चांगले झाले पाहिजे. व्यतिगत तुमच्याकरिता आमचा कोणाचा आकस नाही आहे किंवा तुम्हाला टिका करून आम्हाला सुख मिळते अशातला भाग नाही आहे. तुम्ही व्यवस्थित जर चांगले ठराव आणले तर त्याच्यावर कमी चर्चा होईल आणि लवकरात लवकर मंजूरी मिळेल. तुम्ही जर कुठे आळशीपणा केला. आता सांगितले की हा कालावधी संपत आलेला आहे आणि त्या दरम्यान सभा झाल्या नाहीत का? इलेक्शनच्या अगोदरच्या सभेत तुम्ही घेउ शकत नव्हता का? आम्ही बोललो होतो का तुम्हाला मंजूरी देणार नाही. ॲडव्हान्समध्ये मंजूरी घ्यायला हरकत काय होती. आमचे म्हणणे एकच आहे पाटील साहेबांना आम्हाला टिकेचे घाव घालून घायाळ करून मजा वाटते अशातला भाग नाही आहे. कुठेतरी अनावधानाने आम्ही अडचणीत येउ व आमच्याबरोबर तुम्हीदेखील याल. आम्ही तुम्हाला सारखे वेळेवर सांगतो, आम्हाला हे राजकरण करण्याची हौस नाही आहे. तुम्हाला काय तरी घालून पाडून बोलायचे आणि हिरो बनायचे अशातला भाग नाही आहे. मी वेळोवेळी सांगतो कोणी गैरसमज करून घेउ नका सारखे सारखे हे चुकीचे प्रस्ताव येतात आणि परत परत तुमच्या वेळेलासुद्धा हे आले आहेत. त्यावेळी तुम्हीदेखील प्रत्येक अधिकाऱ्यांवर चिडला होता. सारख्या चुका करायच्या आणि परत परत सुधारणा करत राहायचे. साहेब क्षमापित एकदाच असते ना. झोपी गेलेल्याला तुम्ही जागे करू शकता, झोपेचे सोंग घेणाऱ्याला तुम्ही जागे करू शकत नाही.

**दिनेश नलावडे :-**

सभापती साहेब हा जो १५३ विषय आहे विशेष कार्यकारी अधिकारी ह्यांची नियुक्ती करण्यासाठी पाच महिन्याच्या मुदतीसाठी हा विषय आलेला आहे. आपण विषयाला बगल दिलेला आहे आणि विषयाला बगल दिल्यामुळे एक तास आपल्या सभागृहाचा वेळ गेला आहे व प्रत्येक वेळी सभापती साहेबांनी रूलिंग दिलेली आहे आपला जो विषय आहे तो सोडून जी काय आपल्याला चर्चा करायची आहे ती आपण आपली सभा संपल्यानंतर करू शकतो आणि म्हात्रे साहेब आपण दरवेळेला सांगता की आम्ही ह्याच्यामुळे अडचणीत येउ तर आपण एकटे अडचणीत येणार नाही, आले तर अधिकारी आणि

सोळा सदस्य सर्व अडचणीत येणार आहे. त्यामुळे तुम्ही दरवेळी एकटे आपल्यावर घेता आणि विषय मंजूर झाले पाहिजे का? काटेकोरपणे पालन झाले पाहिजे का? हा विषय आपण बघा.

**याकुब कुरेशी :-**

सभापती साहेब, माझे असे म्हणणे आहे की जे काय वाद संवाद होतात, ते माझ्या मते सभापती महोदयांकडे व्हायला पाहिजे. एकमेंकाकडे भांडून ही सभा होणार नाही.

**मोहन पाटील :-**

चांगला प्रस्ताव ह्या ठिकाणी याकुब कुरेशी साहेबांनी मांडला आहे. धन्यवाद. आता ह्या ठिकाणी विषयला बगल देउन चालले आहे आणि गोषवाऱ्यामध्ये अन्य बाबी आलेल्या आहेत. सभापती महोदय, अनुषंगाने विषय निघतात आणि त्या गोषवाऱ्यातले कोणते विषय घ्यायचे ते आपण ठरवा. म्हात्रेजी ह्यांनी विषय मांडले आहेत. माळी साहेब यांनी ह्या ठिकाणी चांगले काम केलेले आहे. हे मिलन म्हात्रेजींनी सुद्धा मंजुर केलेले आहे. प्रत्येक विषयाचा गोषवारा आल्यानंतर किंवा तो विषय येतो तर आपण त्या विभागाशी म्हणजे लेखा अंतर्गत विभागाशी आपण संपर्क साधला पाहिजे. प्रत्येक विषयाला सचिवजी बजेटचा प्रश्न येतो तर आपण त्यांच्याशी चर्चा करून आपण करून घ्यायचे. आणि आपल्या कायदेशीरबाबी आपण मान्य करायचे व कायदा सोडून अन्य बाबी आपण मान्य करतो ते कशा, ज्याप्रमाणे उपआयुक्त साहेब ह्यांनी सांगितले की अनावधनाने चुका होतात ते आम्ही मान्य करतो. पण अधिकाऱ्यांनी आमच्यासमोर माफी मांगणे किंवा एखादी अनावधनाने चुका झाले असे बोलावेत आणि त्या आम्ही एकावे अशा मनस्थितीचे आमचे सदस्य नाही आहेत. सभागृहामध्ये सभा चालवत असताना ती महासभा असू दे किंवा स्थायी समितीची सभा असू दे किंवा अन्य समिती असू दे. जेवढया अधिकाऱ्यांना काम करण्याची संधी देता येईल, त्यांना कायदेशीर काही बाबी मांडता येईल, आणि जर का काही चुका राहिल्या असतील तर त्या चुका पुन्हा न करता येईल व सन्मा. त्यावेळचे मुख्यअधिकारी आणि त्यावेळचे आयुक्त साहेब आणि आताचे उपआयुक्त साहेब यांनी अतिशय चांगल्या पद्धतीने सन्मा. सदस्य म्हात्रेजी बोलले की तुमचा वापर मा. महासभेत आणि येथेसुद्धा करतात. वापर करण्यापेक्षा त्यांचा ह्या शहरामध्ये एखादे काम करताना माझा मी अपमान गिळतो. आणि जर तुम्हाला काही मदत करता येईल तशी मदत मी करायला तयार आहे. उद्या त्या डायसवरून ह्या ठिकाणी कधीही मी असा विचार केलेला नाही आहे, शहराच्या सर्व नगरसेवकांना, अधिकाऱ्यांना त्यांनी उत्तम असे मार्गदर्शन केलेले आहे. कायद्याच्या बाबतीत म्हात्रेजी त्यांना चांगली माहिती आहे आणि त्यांनी आपल्याला ते सिद्ध करून दिले आहेत ते आपणही मान्य करता. त्याबद्दल मला म्हात्रेजी आपल्याबद्दल जरा कटूता वाटली त्यांच्याबद्दल असे बोलल्यामुळे. ठिक आहे, सभापती साहेबांकडून त्यांना रूलिंग दिली पाहिजे की त्यांनी बोलले पाहिजे. मुख्यालय उपआयुक्त ह्या ठिकाणी केळकर साहेबांकडे आहे त्यांनी उत्तर दिले पाहिजे. सभापती साहेबांनी रूलिंग दिली पाहिजे की त्यांनी उत्तर द्यावे तर ते त्याचे उत्तर देतील. आपल्याला जर चांगल्या बाबतीमध्ये चांगले मार्गदर्शन जर होत असेल तर आपणच अधिकाऱ्यांना बोलायला मुभा दिली पाहिजे कारण अधिकारी आपल्याला बोलायला मुभा देउ शकत नाही. स्थायी समिती आणि सभागृह त्यात एवढी ताकद आहे की त्या त्या ठिकाणचे ते ते अधिकारी सभापतींसमोर सचिव आहेत, मा. महापौरांच्यापुढे ते सचिव आहेत. त्यांना तो अधिकार नाहीच आहे. त्यांना अधिकार आपण प्राप्त करून देतो आणि आपण ते अधिकार प्राप्त करून दिल्यानंतर तो अधिकारी तळमळतेने, सक्षमतेने चांगले सहकार्य करत असतील तर त्याचे सहकार्य घ्या आणि जर सभागृहामध्ये अशी बाब आली असेल तर सर्वांच्या वतीने मी आपल्याला सांगतो की, असे कोणत्याही पद्धतीने आपल्याला वागणूक मिळणार नाही कोण असे बोलणार नाही व कोण आमच्याकडून असे बोलले असेल तर आम्ही शब्द मागे घ्यायला तयार आहोत आणि आपण आम्हाला जे वेळोवेळी मार्गदर्शन केलेले आहे तसे मार्गदर्शन आपण आम्हाला जरूर द्या आणि केळकर साहेब अवधानाने चुका होत असतील तर अवधानाने चुका मान्य करायच्या नाहीत, चुका होता कामा नयेत. आपण आपला मोठेपणा सांगितला ह्या ठिकाणी माळी नविन नव्याने आहेत, आम्ही ही नव्याने होतो आम्हालाही मार्गदर्शनाची आवश्यकता होती. म्हात्रेजी बोलतात आणि त्यांच्या बोलण्याच्या पाठीमागे सुद्धा चांगली पद्धत आहे. पण ते घेण्यावर अवलंबून आहे. आपण जे बोलता त्याची कोणती बाजू आम्ही घेतली पाहिजे. हा विचार मी करतो. इतर सन्मा. सदस्यांनी कोणता विचार केला असेल ते त्यांचे वैयक्तिक मत आहे. हे चांगले अधिकारी आहेत व ह्या ठिकाणी चांगला विषय आणला आहे. त्यांची नेमणुकीच्या पाच महिन्याचा कालावधी

संपल्यानंतर त्यांना गॅप द्यावा लागतो आणि मधला गॅप दिल्यानंतर त्यांना पुन्हा कामावर रूजु करु शकतो. मी ह्या ठिकाणी माळी ह्यांची नियुक्ती करणेबाबत या ठिकाणी ठराव मांडत आहे.

**चंद्रकांत वैती :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील ह्यांनी या ठिकाणी मांडलेल्या ठरावाला मी अनुमोदन देत आहे.

**रिटा शाह :-**

ठरावाचे अनुमोदन व्हायच्या अगोदर मी बोलली आहे की मला बोलायचे आहे. माझे दुमत नाही की माळी साहेबांनी उत्कृष्ट अशी कामगिरी याठिकाणी केलेली आहे. पण माझी येथे सूचना आहे, ती सूचना आपण ऐकून घ्यावी. हे अनुमोदन आणि ठराव घ्यायच्या अगोदर स्थायी समितीचे जेव्हा मतदान झाले आणि पुढे शिक्षण मंडळाचे आपण मतदान घेणार आहोत तेव्हा मतदान आपण गुप्त प्रक्रियेत करतो त्यावेळी आपल्याकडे सोळा सदस्य होते व त्यावेळी मी ऑब्जेक्शन घेतले नाही, तेव्हा जर मी ऑब्जेक्शन घेतले असते तर माझ्या पक्षात माझ्यामध्ये काहीतरी उलटपुलट आहे असे साबित झाले असते. आज स्थायी समितीसमोर विषय आला म्हणून मी मुद्दामहून बोलू इच्छिते, गुप्तमतदान म्हणजे कोणी कोणाला मत दिले हे कोणालाही कळणार नाही ते मतदान. एक ते सोळा सदस्य स्थायी समितीचे होते आणि ज्यांनी ज्या नंबरप्रमाणे मतदान केले त्याप्रमाणे त्यांना बॅलेट पेपर दिले गेले होते. ते मी स्वतः डोळयानी बघितले आणि टॅली केले. पहिल्या नंबरवर जो माणूस होता त्याला पहिल्या नंबरचे बॅलेट पेपर दिले गेले, दुसऱ्या नंबरवर आला त्याला दुसऱ्या नंबरचे बॅलेट पेपर दिले गेले. त्यामुळे आपण सहाजिकपणे समजून घेणार की हे मत कोणाचे आहे आणि कोणी कोणाला मतदान दिले आहे. हे गुप्त मतदान झाले नाही. अशा तऱ्हेची चुक पुढे व्हायला नाही पाहिजे. कारण आपले लोकशाही देश आहे आणि लोकशाही प्रक्रिया व्हायला पाहिजे. असे हे जाणूनबुजून केले आहे हे मी मानत नाही.

**मा. सभापती :-**

नाईक साहेबांना मी येथे सभागृहात बोलावल्यानंतर त्यांना सभेत बोलण्याचे पूर्ण अधिकार मी दिलेले आहे. ह्याच्यापुढे ते कधीही कुठल्याही विषयावर बोलू शकतात.

**आसिफ शेख :-**

ह्या ठिकाणी सन्मा. सदस्य मोहनजी पाटील ह्यांनी या ठिकाणी ठराव मांडलेला आहे. माळी साहेबांबद्दल या ठिकाणी कोणाचेही दुमत नाही. त्यांनी चांगले काम केले आहे. उपसचिव या पदावर त्यांनी ठाणे महानगरपालिकेत काम केलेले आहे व त्यांना कामाचा अनुभव आहे आणि त्या अनुभवाचा फायदा आपल्या महानगरपालिकेत झालेला आहे आणि आता आपल्याला शिक्षण मंडळाची स्थापना करायची आहे व त्यांच्या निवडणूका घ्यायच्या आहेत. तसेच चार प्रभागांची निवडणूकादेखील लावायचे आहे. तर एखादा आपल्याकडे राज्यकारभार चालवताना दोन प्रतिनिधी आणि प्रशासन हे दोन्ही नाण्यांच्या दोन बाजू आहेत आणि ह्यांनी सामंजस्यप्रमाणे काम करायचे असते. या ठिकाणी माळी साहेबांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण (२) नियम ५३ अन्वये श्री. बी. एम. माळी ह्यांची रूपये दहा हजार मानधनावर आता जो ठराव मांडलेला आहे त्यामध्ये मी अशी दुरूस्ती करतो की, आज पासून त्यांना पाच महिने नियुक्ती करण्यासाठी ही सभा मान्यता देत आहे. सन्मा. सदस्यांनी सांगितलेले आहे की, एक महिना गॅप द्यावा लागतो. आपण कुठेही अडचणीत येता कामा नये आणि जर आपल्याकडे कायदेशीर पद्धत असेल तर त्याप्रमाणे मांडा.

**रिटा शाह :-**

सभापती साहेब जेव्हा एखाद्या सदस्याने विचारले आणि उपआयुक्त म्हणून आपण उत्तर देता. त्यावेळी मधेच दुसरा सदस्य उठून बोलता ही पद्धत बरोबर नाही. स्थायी समिती आपल्याला चालवायची असेल तर पद्धतशीरपणे चालवा. एकाच्या प्रश्नाचे आपण उत्तर द्या किंवा सर्वांचे प्रश्न एकत्रित करून नंतर एकदम उत्तर द्या.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.):-**

मा. सभापती साहेब रिटा शाह मॅडमनी जो प्रश्न उपस्थित केला तो अत्यंत योग्य आहे. मतपत्रिका टाईप करत असताना त्याची जी ओ.सी. असते कापून देण्याची त्यावर नंबरींग असावे मतपत्रिकेवर नंबरींग नसावे. यापुढे प्रशासनाने लक्ष ठेवावे की आपण जी मतपत्रिका सभासदांना देतो त्यावर नंबर असू नये. यापूर्वी कधी आम्ही नंबर टाकलेले नव्हते पण चुकून यावेळेला टाकले गेले असेल तर यापुढे दुरूस्त करावी. यापूर्वी आम्ही टाकलेले नव्हते खालच्या पानावर नंबर टाकू नये.

अशी प्रशासनाने दक्षता घ्यावी. दुसरा महत्त्वाचा मुद्दा माळी साहेबांच्या बाबतीत जो चर्चेचा विषय सुरू आहे यामध्ये जो नविन नोकरीला लागतो त्यावेळेला २४० दिवस झाले म्हणून आपण ब्रेक देतो. हे ठाणे महानगरपालिकेत नोकरीला होते आणि कालामानाने ५८ वर्ष पूर्ण झालेली आहेत म्हणून ते रिटायर झालेले आहेत. नविन व्यक्तीची नेमणूक झाल्यानंतर ब्रेक देतो कारण ती नविन व्यक्ती नोकरीत कायम होउ नये. २४० दिवस झाल्यावर प्रशासनावर, सभागृहावर ते येउ नये या भितीने आपण तो ब्रेक देतो. हे सेवानिवृत्त झालेले आहेत आणि त्यांच्या अनुभवाचा फायदा महानगरपालिकेला व्हावा. आणि ही महापालिका नविन आहे म्हणून त्यांचा अनुभवाचा फायदा घेण्याकरिता आपण त्यांची नियुक्ती करत आहोत आणि सेवानिवृत्ती झालेल्या व्यक्तीला ब्रेक देण्याची आवश्यकता नाही. आपण त्यांना सल्ला देण्यासाठी मानधनावर त्यांची नेमणूक केली. ह्यांना कंटीन्यू केले तर बरे होईल कारण त्यांनी महिना येथे काम केलेले आहे व त्या महिन्याचा पगार त्यांना मिळणे आवश्यक आहे.

**रिटा शाह :-**

नाईक साहेब आपण आता सांगितले की तुमच्याकडून चुका झालेल्या आहेत. दोन्ही बॅलेट पेपरवर नंबरींग टाकायला नाही पाहिजे होते आणि आपण टाकून घेतले हे मान्य केलेले आहे. मग मागचे स्थायी समितीचे जे इलेक्शन झाले ते वॅलिड आहे की इनवॅलिड आहे. तर ते इनवॅलिड आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

जे इलेक्शन झाले ते वॅलिड आहे. नंबर टाकायला नको होते ते टायपिंग मिस्टेक झाली आहे.

**रिटा शाह :-**

टायपिंग मिस्टेक नाही. ते नंबर हाताने टाकले होते.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

स्थळ प्रतिवर यापुढे नंबरींग असावे. मतपत्रिकेवर नंबर नसावे व यापुढे टाकले जाणार नाही.

**रिटा शाह :-**

हे होते आपण असे मान्य करता ना.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

परंतु ह्याचा अर्थ ही निवडणूक बेकायदेशीर ठरली असे नाही आहे. ती निवडणूक कायदेशीर आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब आपल्याला माहिती असेल आपण ठाणे महानगरपालिकेतून आलेले आहात. या मतदानावरून श्रीधर खोपकर या नगरसेवकाची हत्या झाली होती.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

यापुढे नंबर टाकले जाणार नाही. दुसरे महत्त्वाचे की, मी ज्यावेळेला कॅबिनला बसतो त्यावेळेला माझ्याकडे दोन खाती असतात. नागरिक किंवा सभासद आल्यानंतर मी हे विभाग माझ्याकडे नाही असे सांगतो. त्याचा अर्थ असा नाही की ह्या सभागृहात स्थायी समितीमध्ये आणि मा. महासभेत बसल्यानंतर मी या महानगरपालिकेच्यावतीने, प्रशासनाच्यावतीने उत्तर देत असतो. आणि ज्यावेळेला मी कॅबिनमध्ये बसतो त्यावेळी दोनच खाती माझ्याकडे असतात आणि त्या दोन खात्याखेरीज अन्य खात्याचे काम माझ्याकडे आले की ते खाते माझ्याकडे नाही म्हणून मी सांगतो. परंतू मी ज्यावेळेला स्थायी समितीत आणि महासभेत असतो त्यावेळेला मी प्रशासनाच्यावतीने बोलत असतो व त्या खात्याचा माझ्यासोबत सभागृहात बसल्यावर संबंध जोडता येणार नाही.

**मिलन म्हात्रे :-**

हे जे आपण बोलता ते रेकॉर्ड करून घ्या. कारण हा विषय पुन्हा येणार आहे आणि ह्याविषयावर मी आता जास्त बोलणार नाही. ८/९/२००३ ला जे मानधन दिले आहे की नाही त्याचा उल्लेख गोषवाऱ्यात नाही आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

साहेब, नविन माणूस नेमल्यानंतर २४० दिवस होतात आणि कोर्टात केस जाते तेव्हा नोकरीत कायम करावे लागते म्हणून आपण ब्रेक देतो. हे सेवानिवृत्त झालेले आहेत त्यांना ब्रेक देण्याची आवश्यकता नाही. त्यांनी कंटीन्यू काम केलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांना पगार दिला आहे का?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सा.) :-**

पगार दिलेला नाही. तुम्ही मंजूरी दिल्यानंतर पगार देणार.

**मिलन म्हात्रे :-**

किती महिन्याचा पगार राहिला आहे ते देखील आपण ह्याच्यामध्ये क्लिअर करून टाका.

**हॅरल बोर्जीस :-**

प्रकरण क्र. १५३ ला मोहन पाटील साहेबांनी ठराव मांडलेला आहे आणि ठरावामध्ये दुरूस्ती आसिफ शेख ह्यांनी सुचवलेली आहे. वास्तविक त्यांना त्यांनी ज्या तारखेपासून काम केलेले आहे त्या तारखेपासून त्यांना पगार मिळायला पाहिजे. परंतू हा विषय ह्या सभेच्या आधीच्या सभेत यायला पाहिजे होता. आसिफ शेख ह्यांनी जी दुरुस्ती सुचवली त्याप्रमाणे ठराव मान्य करावा.

**आसिफ शेख :-**

त्यांनी काम केलेले आहे. त्यांना मानधन मिळायला पाहिजे. त्याना प्रशासनाने ते मानधन आपल्या अखत्यारिमध्ये द्यावा आणि सभागृहाने ह्या ठरावामध्ये दुरूस्ती केलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब पूर्वीचा जो आदेश आहे. त्याच्यामध्ये फक्त पाच महिन्याची मुदत आहे. मधले दोन महिने त्यांनी जे काम केले आहे. त्या मानधनाचे आपण काय करणार आहात.

**मा. सभापती :-**

आता आपण निर्णय घेतला आहे ना आजपासून त्यांना मुदतवाढ देण्याची आणि त्यांना मानधन त्या दोन महिन्याचे देण्यात येईल.

**चंद्रकांत वैती :-**

मागील तारखेपासून असे करून घ्यावे.

**आसिफ शेख :-**

आजपासून पाच महिन्याकरिता मुदतवाढ देण्यात येत आहे.

**चंद्रकांत वैती:-**

मग त्यांचा दोन महिन्याचा पगार अडचणीत येतो.

**मोहन पाटील :-**

मी सभागृहाच्या वतीने ठराव मांडला आहे आणि जर त्यांच्या मानधनाचा प्रश्न ह्या ठिकाणी येत असेल तर आपण जेथून त्यांची मुदत संपली तेव्हा पासून पाच महिने असा ठराव करावा आणि त्यांना त्यांचे मानधन देण्यात यावे.

**प्रकरण क्र.१५३ :-**

श्री. बी. एम. माळी यांची सचिव विभागाकडे विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करणेकरिता.

**ठराव क्र. १३३ :-**

श्री. बी. एम. माळी हे ठाणे महानगरपालिकेचे उपसचिव म्हणून निवृत्त अधिकारी आहेत. त्यांना सचिव विभागातील कामाचा व प्रशासनाबाबतचा चांगला अनुभव आहे. त्यांच्या अनुभवाचा आपल्या महापालिकेच्या सचिव विभागास चांगले सहकार्य मिळालेले आहे. वृक्ष प्राधिकरण समिती स्थापन करणेकरिता त्यांनी संपूर्ण माहिती आणून त्याबाबतचा प्रस्ताव महासभेत सादर करुन पूर्ण कार्यवाही केली. शिक्षण मंडळ स्थापन करणेबाबत संचालक पुणे येथे दोन वेळा जाऊन मंत्रालयाशी संपर्क साधून त्यांतील त्रुटी दुर करुन मा. महापौरांकडे प्रस्ताव सादर केला. प्रभाग समित्या स्थापन करणेंचा प्रस्तावही त्यांच्या मार्गदर्शनामुळे महासभेपुढे ठेवण्यांत आला होता. तसेच महिला व बालकल्याण समितीचा प्रस्ताव महासभेपुढे घेण्यांत आला होता आणि स्थायी समिती आठ सदस्यांची निवडणुक प्रक्रिया व सभापती स्थायी समिती निवडणुक त्यांच्याच मार्गदर्शनामुळे सुस्थितीत पार पाडण्यांत आल्या. म्हणून श्री. बी. एम. माळी हे सर्व कार्यप्रणाली पाहाता त्यांची सचिव खात्यांस जरुरी आहे.

त्याकरिता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण २ नियम ५३ अन्वये श्री. बी. एम. माळी यांची रुपये ९,९९९/- दरमहा मानधनावर दि. ०८/०९/२००३ पासुन ५ महिन्यांसाठी नियुक्ती करणेंस ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. मोहन पाटील.** **अनुमोदन :- श्री. चंद्रकांत वैती.**
**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १५४ चे वाचन केले.)

**मोहन पाटील :-**

सन्मा. सभापती आपण ह्या ठिकाणी विषय आणलेला आहे वैद्यकीय अधिकारी व कार्यकारी अभियंता ही पदे महापालिका आस्थापनेवर कायम स्वरूपी भरणेबाबत हा विषय अतिशय चांगला आहे. आपल्याकडे बरेच असे अधिकारी आहेत आणि आपल्याला अशी पदे भरायची आहेत आणि असे बरेचसे विषय आपल्याला घ्यायचे आहे. प्रशासनाने ह्याच्यामध्ये स्वारस्य रस घेतल्यामुळे धन्यवाद.

**अशोक पाटील :-**

विशेष अधिकारी आणला पाहिजे हा विषय आणला आहे तर त्याचे प्रशासनकाडून स्पष्टीकरण व्हावे की नक्की काय विषय आणला आहे.

**मोहन पाटील :-**

सदर विषयाचा कोणताही गोषवारा या ठिकाणी नाही आहे. म्हणून या विषयावर चर्चा होउ नये आणि सभेचा वेळ घेउ नये व सदर विषयावर चर्चादेखील नको आहे. आपण पुढचा विषय घ्यावा.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त साो.) :-**

सन्मा. सभागृह हा विषय आस्थापनाचा नाही व प्रशासनाकडून आलेला नाही. सन्मा. सदस्य श्री. वैती साहेब ह्यांनी पत्र दिले होते म्हणून तो विषय सभापती साहेबांनी विषयपत्रिकेवर घ्यायला सांगितला होता.

**मोहन पाटील :-**

तरी सदरच्या विषयावर गोषवारा दिला पाहिजे. गोषवारा नाही काही दिले नाही तर आपण त्याच्यावर निर्णय काय घेणार? त्यांचे पत्र आहे त्यात त्यांचे विचार आहे. सभापती साहेबांसमोर त्यांचे विचार विचारार्थ घेउन गोषवारा तयार करा की असे असे पत्र आले आहे आणि त्यानंतर पुढच्या सभेत आपण विषय आणा.

**प्रकरण क्र. १५४ :-**

वैद्यकीय अधिकारी व कार्यकारी अभियंता ही पदे महापालिका आस्थापनेवर कायम स्वरूपी भरणेबाबत.

**ठराव क्र. १३४ :-**

आवश्यक कागदपत्रांची पुर्तता न झाल्यामुळे सदरचा ठराव नामंजुर करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. मोहन पाटील.** **अनुमोदन :- श्री. अशोक पाटील.**
**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १५५ चे वाचन केले.)

**मिलन म्हात्रे :-**

सभापती महोदय, २३/१०/२००३ च्या विषयपत्रिकेवर विषय आला आहे. आणि आम्हाला १८/१०/२००३ ला सूचना दिली की सदर लिलाव कधी झाला केव्हा झाला त्याची आम्हाला काहीच

कल्पना नव्हती. कुठलाही लिलाव, लिलाव हा शब्द मुद्दामुन वापरतो. बाजाराचा लिलाव, तलावाचा लिलाव अन्य जे काही लिलाव होतात त्यावेळेला स्थायी समितीच्या सर्व सदस्यांना बोलावले जाते. परंतू हा लिलाव कधी झाला हे आम्हाला माहित देखील पडले नाही की हा लिलाव कधी झाला, कुठल्या वर्तमान पत्रात आले. आम्हाला पत्रदेखील दिले गेले नाही. आमचा लिलावाला विरोध नाही. भंगार सर्व हटले तर आपल्या गाडया व्यवस्थित दिसेल सुदंर दिसेल या मताशी आम्ही आहोत. पण हे सर्व करताना आपण आम्हाला विश्वासात घ्या ना. आतापर्यंतच्या लिलावाला आम्हाला सांगितले गेले की आपण उपस्थित राहा आणि आम्ही राहिलेलो आहोत. ह्या वेळेला एखादे कुठल्या तरी वर्तमान पत्रात देउन टाकले आणि दोन प्रती छापल्या. कामकाज आटपले. लिलाव झाला आणि उचलायला घेतले तेव्हा आम्हाला कळले की ह्याचा लिलाव झाला.

**मा. सभापती :-**

मी सभापती होण्यापूर्वीचा हा विषय आहे.

**मिलन म्हात्रे :-**

हा लिलाव आता झालेला आहे. दोन दिवसापूर्वीचा आहे.

**मा. सभापती :-**

लिलाव आता झाला पण तो विषय कधी झाला हे मला माहिती नाही.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, ही पेपर नोटीस आहे. तुम्हालाही माहिती नाही म्हणजे काय सांगायचे.

**दिपक खांबीत :-**

दैनिक वार्ताहार मध्ये ३/१०/२००३ ला राज्यस्तरीय नोटीस दिली आहे.

**रिटा शाह :-**

लिलावामध्ये सदस्यांना बोलवायचे नाही. जर आपल्याला असा कारभार चालवायचा असेल तर असा कारभार चालवा.

**मिलन म्हात्रे :-**

लिलाव व्हावा साफ स्वच्छता व्हावी या मताशी आम्ही आहोत आणि आतापर्यंत झालेल्या लिलावामध्ये आम्हाला बोलावले गेले आहे. या लिलावाला बोलावले गेले नाही.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सभापती साहेब, या ठिकाणी मिलनजी म्हात्रे आणि रिटा शाह यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्या मुद्याशी मीदेखील सहमत आहे. मला चार पाच गोष्टींचा ह्यामध्ये खुलासा पाहिजे. लिलाव कोणत्या तारखेला झाला? विलंब होण्याची कारणे काय? आता मंजूरी घेण्याची आवश्यकता का भासली आहे? आणि टिपणीमध्ये कोणतेच फिगर दिले नाही की किती हातगाड्या होत्या, बोर्ड बॅनर किती होते? इतर सामान म्हणजे काय त्याची एकूण संख्या किती आहे असे गोषवा-यामध्ये काहीच दिलेले नाही. व मूल्यांकन कोणी केले? की या गाडीची किंमत एवढी आहे असे मूल्यांकन करणार कोण? आपण ह्याचे सर्व आम्हाला खुलासा करून सांगा. हे संपूर्ण झाल्यानंतर स्थायी समितीची आवश्यकता आहे का?

**रिटा शाह :-**

ह्या मंजूरीला माझा विरोध आहे असे आपण नोंदवून घ्या.

**आसिफ शेख :-**

दुसरी गोष्ट अशी की हे कधीचे काम आहे आणि कधी मंजूरीला येत आहे. मी पहिल्या दिवसापासून सांगतो की हे प्रशासनाचे काम चालले आहे ते व्यवस्थित चालले पाहिजे. सभापती साहेब, महत्त्वाची गोष्ट म्हणजे आमच्या पाणी पुरवठा विभागामध्ये आमच्या प्रभागातील टेंडर निघाले. टेंडर निघून कमीत कमी दोन ते तीन महिने झाले. टेंडर आले ते फोडून वगैरे ठेवले पण अजून स्थायी समिती समोर आले नाही. दिवाळी जवळ आहे. नाताळ जवळ आहे. सर्व सण जवळ आहेत. तिथे पाईप लाईन टाकायचे आणि ते टेंडर अजून स्थायी समितीसमोर आलेले नाही. एवढा विलंब का झाला? मंजूरी घेण्यासाठी सभागृहात विषय यायला पाहिजे होता. अडचण काय आहे. कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा यांनी याबाबत खुलासा करावा. तीन महिने झाले आहे. टेंडर येउन सर्व टेंडर फोडून तरी ते

सभागृहापुढे का आले नाही. म्हणजे तुम्ही तुमच्या मनाप्रमाणे काम करणार आहे का? लोकांसमोर कोण जबाबदार राहणार आहे. तुम्ही जबाबदार राहणार आहात का?

**याकुब कुरेशी :-**

सभापती साहेब, आपण रूलिंग दिले होते की पुढच्या सभेत तुम्हाला उत्तर मिळेल. मग अजून उत्तर का दिले जात नाही.

**मिलन म्हात्रे :-**

गोम्स स्ट्रीटमध्ये पाईप लाईन टाकायची आहे. त्याच गोम्स स्ट्रीटमध्ये रस्ता रुंदीकरण क्रॉंक्रीटीकरण करण्यासाठी मंजूरी मिळालेली आहे. तर आम्ही त्या ठेकेदाराला सांगितले आता काम करू नको तर का करू नको पाईप लाईन पडल्यानंतर पुन्हा पुन्हा महापालिकेला खर्च नको. आम्ही महापालिकेचे हित बघायचे आणि प्रशासन ह्या कामामध्ये दिरंगाई करते. अडचण काय आहे.

**दशोरे :-**

मा. स्थायी समितीची मंजूरी घेउन निविदा काढण्यात आली होती. निविदा जेव्हा काढण्यात आली होती तेव्हा ३० ते ४५ टक्के जास्त आली होती आणि सर्व ठेकेदारांना निगोशिएशनसाठी वाटाघाटीसाठी बोलावण्यात आले होते तर त्यांनी १२ ते १४ टक्के अबव्ह काम करण्याची हमी दिली होती. पण ते १२ ते १४ टक्के अबव्ह काम आहे तर ते रिझनेबल आहे की नाही यासाठी ॲथोराईज कंपनी आहे कपिला त्यांच्याकडून आम्ही रेट मागवून घेतले. त्यांच्याकडून रेट आलेले आहे. आणि आपण कम्पलिट स्टेटमेंट तयार केलेले आहे.

**आसिफ शेख :-**

पेपरमध्ये नोटीस कधी आली ते आपण मला सांगा. तीन महिने नोटीस देउन झाली आहे आणि स्थायी समितीची सभा आठ आठ दिवसात लागते. मला तुम्ही एक महिन्यापासून सांगितले आहे की ह्या सभेमध्ये घेतो त्या सभेमध्ये घेतो. मग त्यात अडचण काय आहे.

**दशोरे :-**

बारा टक्के रिझनेबल आहे की नाही ते आम्हाला जस्टीफिकेशन करावे लागते.

**हॅरल बोर्जीस :-**

कम्पॅरेटीव्ह स्टेटमेंट तयार करून पुढच्या स्थायी समितीमध्ये विषय घेउन यावा अशी माझी आपल्याला विनंती आहे.

**मा. सभापती :-**

हा विषय पुढच्या स्थायी समितीमध्ये घेण्यात यावा.

**मिलन म्हात्रे :-**

हा जो लिलाव झाला. त्याच्यामध्ये आपण भंगार विकतो. त्याच्यामध्ये आपले चांगले ट्रॅक्टर गेले ॲब्युलन्स जाउन बघा फायरब्रिगेडच्या बाहेर पडले आहे आणि जी गाडी उचलून न्यायला पाहिजे ती गाडी तशीच आहे. माझा सांगायचा दृष्टीकोन असा आहे की जो भंगार आहे तो नेलेले नाही आहे. मेन मेन चांगले चांगले ट्रक्टर उचलले. आपल्या गॅरेजमध्येच रिपेर केले आहे व पार्ट टाकले आहेत. नाईक साहेब आपण ह्याचा खुलासा करावा.

**रिटा शाह :-**

नाईक साहेब दोघांचे एकत्र करून आपण उत्तर द्या. आपल्याकडे भंगार विकले आणि जो लिलाव केला आणि आता आपण सर्व केल्यानंतर आमच्याकडे मंजूरीला आणलेले आहे. तुम्ही लोकांकडून कोणतेही सामान उचलून आणणार आणि तुमच्यापद्धतीने तुम्ही विकून टाकणार व नंतर नगरसेवकांना विचारणार की आम्हाला मंजूरी द्या. जर तुम्हाला तुमच्या पद्धतीचे कारभार चालवायचे असते, जसे प्रशासन राज असते तुम्ही तसे चालवून घ्या. माझा ह्याला संपूर्णपणे विरोध आहे असे आपण नोंदवून घ्या.

**नितीन ठाकूर :-**

सभापती साहेब, समजा आम्ही हा विषय नामंजूर केला. लिलावाचा ठेका ज्याने घेतलेला आहे आणि त्याने जो भंगार माल नेलेला आहे, तो ते आपल्याला परत देईल का? त्याला जिम्मेदार कोण?

**अशोक पाटील :-**

सभापती महोदय, आतापर्यंत जे तीन विषय आलेले आहेत ते प्रशासनाकडून आलेले आहेत. व ते वादादित ठरलेले आहे. ह्याच्यापुढे आपल्याला रूलिंग द्यायचे आहे. या सभागृहाचे गांभीर्य आपल्याकडे आहे. त्यामुळे प्रशासनाकडून जे विषय येतील ते आपण कायदेशीर तपासून घ्या. जेणेकरून सभासदांचा व अधिका-यांचाही विषय वाया जाता कामा नये.

**आसिफ शेख :-**

आम्ही विचारलेल्या प्रश्नावर आपण खुलासा करा.

**रिटा शाह :-**

सभापती साहेब, हा जो आपल्याकडे लिलावाचा विषय आणलेला आहे. आणि हा लिलाव प्रशासनाने संपूर्णपणे चुकीच्या पद्धतीने केलेला आहे. म्हणून मी असा ठराव मांडत आहे की अशा लिलावाला प्रशासनाने केलेल्या कामकाजाबद्दल मंजूरी द्यायची नाही.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

सभापती साहेब, या महापालिकेमध्ये ज्या ज्या वेळेला लिलाव होतात, त्या त्य ावेळेला लिलाव करताना स्थायी समिती सदस्यांना बोलावले पाहिजे असे कायद्यामध्ये तरतुद नाही. मात्र प्रशासन काही चुक करते का ते बघावे म्हणून आम्ही स्वतःहून बोलवत असतो. जेणेकरून तुमच्यासमोर अमाउंन्स व्हावी. बाजार लिलाव, तलावाचे लिलाव हे मोठ्या रक्कमेचे असतात. त्यामुळे आपल्या समक्ष आकडे समजावे किंवा लिलावात काही चुक झाली की आपल्याला समजावे. हा भंगार लिलाव अतिक्रमणामध्ये हातगाडया किंवा जे मटेरियल आणलेले आहे. व हा किरकोळ रक्कमेचा विषय आहे. कायद्याने लिलाव करताना कुणालाही न बोलवता लिलाव करण्याचा अधिकार आयुक्त साहेबांचा आहे. मोठमोठया रक्कमेचा लिलाव होतो तेव्हा आम्ही स्थायी समितीच्या नगरसेवकांसमोरच लिलाव करतो आणि ह्यापासून फार मोठी रक्कम येणार नाही. आणि अतिक्रमणापासून मिळालेले मटेरियल त्याचे लिलाव करायचे आहे आणि काही हातगाड्या मोडलेले आहे व ते पुन्हा रस्त्यावर येउ नये. मग अतिक्रमणामध्ये जप्त केलेला लिलाव हा फार रक्कमेचा नाही म्हणून प्रशासनाने लिलाव केला. आयुक्त साहेबांचा लिलाव करण्याचा अधिकार आहे आणि आयुक्त साहेब जे प्राधिकृत करतील त्या व्यक्तीने लिलाव करायचा आहे. कृपा करून असे वाटून घेउ नये की लिलावाला बोलावले नाही. जे मोठया रक्कमेचे लिलाव असतात त्याला स्थायी समितीचे सभासद असावे व त्यांना समजावे म्हणून आपण प्रशासनातर्फे त्यांना विनंती पत्र देतो की, आपण सदरच्य लिलावाला उपस्थित राहावे. पण कायद्याने लिलाव करताना स्थायी समितीच्या सदस्यांना बोलावूनच लिलाव करण्याची तरतुद नाही आहे. आम्ही विनंती करून आपल्याला बोलावले होते. ह्या किरकोळ लिलावासाठी स्थायी समितीच्या सदस्यांना कशाला बोलवायचे म्हणून बोलावले नाही आणि मटेरियल आपल्या कार्यालयाच्या पाठीमागेच पडलेले होते.

**मिलन म्हात्रे :-**

माझ्या माहितीनुसार त्यानी चाळीस चाळीस हजाराचे नविन चार स्टॉल उचलून नेले. एक लाख सोळा हजार एवढी त्याची बाजार किंमत झाली. तो लिलाव व्हायला पाहिजे होते भंगार हटले पाहिजे. साहेब, आमचा लिलावाला विरोध नाही आहे. तुम्ही जे बोललात की लिलावाला बोलावण्यासाठी कायद्यात तरतूद नाही आहे. तर कायद्यात ही पण तरतुद आहे फंडामेन्टल राईट प्रत्येक नागरिकाला आम्ही ह्या नगरपालिकेचे विश्वस्त आहोत. तुम्हाला कायदेशीर नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करायला पाहिजे तसे तुम्ही केले का? जसे पोलीस खाते, रेव्हेन्यु खाते, तहसीलदार ऑफीस, तलाठी ऑफीस तिथे नोटीसा लागतात की हा लिलाव येथे ठेवलेला आहे. आणि हे नोटीस लावायचे हे देखील कायद्यात नाही आहे का? मुख्यालयामध्ये तुम्ही नोटीस लावली असती तर आम्ही हजर राहिलो असतो. आम्हाला त्या लिलावाचा विरोध नाही पण मागच्या वेळेला जसा गुपचूप लिलाव झाला आणि चांगली चांगली वाहने काढून घेतली गेली. आपल्याच गॅरेजमध्ये ती रिपेर झाली आहेत. चांगले ट्रक्टर काढले गेले आणि आपल्या पदाधिका-यांकडे ते गेले आहेत आणि आजही लिलावामधली जी वाहने आहेत ती तिथे पडून आहेत. त्याला कोणीही हात लावला नाही. ॲब्युलन्स उचलतानाच सगळा भुगा होईल.

**अशोक पाटील :-**

लिलाव करताना आयुक्त साहेबांना पुर्ण अधिकार आहे. आमचे काही अधिकार नाही आहेत का? आम्हाला बोलावण्याची आवश्यकता नाही आहे का? स्थायी समितीच्या सदस्यांना बोलावण्यासाठी कायद्यात तरतुद नाही. मग कार्योत्तर मंजूरी तरी आपण कशाला घेता.

**रिटा शाह :-**

आमच्याकडून मंजूरीची आवश्यकता कशाला घेता.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

लिलाव करून मालमत्ता विकली हे तुमच्यासमोर आणायला पाहिजे.

**अशोक पाटील :-**

ती आमच्या डोळयासमोर विकली नाही तर आम्ही त्याला मान्यता काय म्हणून द्यायची.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

लिलाव करण्याचा अधिकार आयुक्त साहेबांचा आहे.

**मिलन म्हात्रे :-**

नाईक साहेब पहिली चुक काय झाली तुम्ही तुमच्या मुख्य कार्यालयात किंवा विभागीय कार्यालयात नोटीस लावली नाही. दुसरी चुक आम्हाला त्याचे पत्र दिले नाही. तिसरी चुक वॅल्युएशनची लिस्ट तुम्ही आम्हाला गोषवाऱ्यासोबत दिलेली नाही. तुम्ही कोणतेही सामान जप्त करून आणता त्याची पावती बनते का?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. सदस्य मिलनजी म्हात्रे ह्यामध्ये सर्व सामानाची यादी आपल्याकडे आहे. आपल्याकडे काय काय सामान होते. त्याचे वॅल्युएशन शहर अभियंता यांनी केलेले आहे ते ९८ हजार पाचशे रूपयाचे केलेले आहे. तसे टिपणीमध्ये देण्यात आलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आपण आम्हाला यादीचे वाचन करुन दाखवा.

(मा. उपआयुक्त केळकर सो. यांनी यादी सभागृहासमोर वाचून दाखविली.)

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

वॅल्युएशन काढल्यानंतर दैनिक वार्ताहार या वृत्तपत्रात जाहिर निविदा काढण्यात आली. दिनांक ३/१०/२००३ रोजी त्यामध्ये सभागृहामध्ये आरोप प्रत्यारोप झाले. प्रशासनाचा असा उद्देश नाही की कुणाला अंधारात ठेवून किंवा कुणाची दिशाभूल करून किंवा ह्यामध्ये काहीतरी गोंधळ करण्याचा हेतू प्रशासनाचा नाही आहे. आम्ही दोन पत्रात जाहिरात दिल्या होत्या. ह्या लिलावामध्ये जवळ जवळ १५ बोलीदार आले होते. आणि जर का पंधरा बोलीदार येतात आणि स्पर्धा झालेली आहे आणि त्या स्पर्धेनुसार एक लाख एक हजार ही अंतिम बोली आहे. त्यानुसार ही निविदा आपल्यासमोर आलेली आहे.

**आसिफ शेख :-**

आपण जो खुलासा केला त्याच्याशी आम्ही सहमत नाही. लिलाव कोणत्या तारखेला झाला हे आपण आम्हाला सांगितले नाही तसेच एवढा विलंब का झाला हे देखील आपण आम्हाला सांगितले नाही.

**चंद्रकांत वैती :-**

मा. सभापती साहेब, उपआयुक्त साहेब, आपण याबाबतीत जो खुलासा केला त्या खुल्यासाप्रमाणे जे ठेकेदार त्या ठिकाणी उपस्थित होते त्यांच्या नावाची यादी गोषवाऱ्यात आलेली आहे. परंतु सोबत जी बोली झाली त्यात किती नग होते. त्याची लिस्ट आली आहे त्याप्रमाणे आपण सेट बनवा आणि सर्व स्थायी सदस्यांना द्या. ह्याच्यापूर्वी नाईक साहेबांनी खुलासा केला की जाहिर लिलावाला बोलावण्याची प्रोव्हीजन नाही. परंतू आपण बोलावतो. ते मोठे लिलाव असतात ते पारदर्शक व्हायला पाहिजे. यापुढे लिलाव करताना जे जाहिर लिलाव असतात त्याचे आपण एन्ट्रन्सला नोटीस लावावी आणि ज्या अर्थी हा माल सामान महानगरपालिकेच्या मागे पडले होते आण ते अडगळीचे झाले होते. मात्र आपण ही निविदा प्रसिद्ध केली महाराष्ट्र स्टेट गर्व्हरमेंट आणि दैनिक वृत्तपत्र आहेत त्याच्यातून काढली. परंतु ह्याच्यापुढे भविष्यात आज जो गोंधळ झाला तसे होउ नये याबाबत काळजी घ्यावी. कारण लिलाव अतिशय छोटा आहे आणि ह्या कार्योत्तर मंजूरीस मंजूरी द्यावी असा मी ठराव मांडत आहे.

**रिटा शाह :-**

साहेब, मी देखील ठराव स्वतः मांडलेला आहे. चुक लहान आहे किंवा मोठी आहे. रक्कम लहान आहे किंवा मोठी आहे ते महत्त्वाचे नसते. हे प्रशासन आणि शासनाचे पैसे आहे हे पैसे लोकांचे

पैसे आहे.  आपले पैसे नाही. आपण लोकांचे सामान उचलून आणले, आपण लोकांच्या सामानाचे लिलाव केलेले आहे.  आणि तो लिलाव तुम्ही पद्धतशीरपणे केलेला नाही. आपल्याकडे दोन उपआयुक्त आणि एक आयुक्त व एवढे आपल्याकडे अभियंता आणि उपअभियंता आहे आणि आपण हे छोटीशी चूक असे म्हणता. आपण जे चुक केली त्यामध्ये अलंकारी शब्द वापरून आपण त्या चुका झाकून देणार तर ते चालणार नाही. तुम्ही नोटीस बोर्डावर लावायला पाहिजे होते.  कुठल्याही स्थायी समिती सदस्यांना माहिती नाही अशाप्रकारचा लिलाव झालेला आहे.  त्या दिवशी मी नाईक साहेबांच्या कॅबिनमध्ये बसली होती.  लिलावाचा प्रश्न आला तेव्हा ते म्हणाले की मला सुद्धा माहित नाही.  त्यांच्या कॅबिनचा प्रश्न येथे काढायला नको होता पण उपआयुक्त साहेबांना देखील माहित नाही की लिलाव ह्या ठिकाणी झालेला आहे.  तर अशा प्रकारचा कारभार आपल्याला ह्या ठिकाणी चालवायचा आहे का? सर्व चुकीचे झालेले आहे. ह्या बद्दलची मंजूरी मी देणार नाही. अशा पद्धतीचा मी ठराव मांडलेला आहे.

**आसिफ शेख :-**

मुल्यांकन केले नाही.  अपसेट प्राईस फिक्स केली नाही. सरसकट रक्कम किती आली. काहीच दिले नाही तर आपण हा विषय पुढच्या सभेत घ्या.

**दिपक खांबीत :-**

मुल्यांकनाबाबत मी तुम्हाला पुढच्या सभेत माहिती देतो.

**रिटा शाह :-**

संपूर्ण गोषवारा आम्हाला सविस्तर द्या आणि पुढच्या सभेत विषय मांडा असा ठराव मी मांडत आहे.

**आसिफ शेख :-**

ह्याला माझे अनुमोदन आहे.

**अशोक पाटील :-**

सभापती महोदय, लिलाव करताना बोली करतात त्याच्यावर सामान बाजार बोलीने जाईल त्याच्यावर सामानांची वॅल्युएशन आहे. समजा एखाद्याचे वॅल्युएशन आपले मार्केट वॅल्युएशन असेल तेवढच मिळाले पाहिजे हा भाग नाही.  पण प्रशासनाकडून चुकी होते. त्यांनी सदस्यांना नोटीस बोर्ड लावून तरी कळवायला पाहिजे की हा लिलाव व्हायला पाहिजे.  तुम्ही आमच्याकडून कार्योत्तर मंजूरी मागता आणि आपण सोबत सामानांची यादी देखील जोडलेली नाही.  आणि कार्योत्तर मंजूरी आम्ही द्यायची यादी न बघताना आणि उद्या समजा एखाद्या नागरिकांनी आमच्याकडे तक्रार केली की माझे सामान ह्याच्यामध्ये उचलले गेले होते आणि ते मला मिळाले नाही. व तुमच्या यादीमध्ये त्याची नोंद नसावी. त्याला जिम्मेदार आम्ही का? कार्योत्तर मंजूरी देणारे.

**रिटा शाह :-**

साहेब, मी ठराव मांडलेला आहे.  सदस्यांनी मांडलेल्या ठरावाला काय वॅल्यु आहे का नाही.

**आसिफ शेख :-**

सन्मा. रिटा शाहजी ह्यांनी प्रथम ठराव मांडला त्यानंतर वैतीजी यांनी ठराव मांडला आणि त्या ठरावाला अनुमोदन दिले आहे. आणि विषय पुढच्या सभेत घेण्याचे ठरले आहे.

**दिनेश नलावडे :-**

सभापती साहेब, हा विषय जो आलेला आहे. तो योग्य पद्धतीने सभागृहात आलेला नाही. ह्या ठिकाणी केळकर साहेबांनी देखील सविस्तर माहिती दिली आणि विषय आपल्याकडे आलेला आहे.  सर्व सदस्यांनी समजून घ्यायला पाहिजे. मी देखील त्या मताशी सहमत नाही. पण विषय आज आपल्याकडे आलेला आहे त्याची माहिती दिलेली आहे. यापुढे प्रशासनाकडून अशी चुक होणार नाही. असे केळकर साहेबांनी आपल्याला या ठिकाणी आवाश्वन दिलेले आहे.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य आसिफ शेख आणि रिटा शाह ह्यांचा विरोध नोंदवून मी हा सदरचा विषय मंजूर करत आहे.

**रिटा शाह :-**

सभापती साहेब आपण आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करुन फक्त एक ठराव मंजुर केला आहे आणि आम्ही मांडलेला ठराव नामंजुर न करता आपण फक्त आमचा विरोध नोंदविला आहे.

**आसिफ शेख :-**

ह्या विषयाला आमचा विरोध नाही. आम्ही सांगितले आपण सविस्तर टिपणीसह हा विषय पुढच्या सभेत घ्यावा.

**प्रकरण क्र.१५५ :-**

महानगरपालिका मुख्य कार्यालय इमारतीच्या आवारातील जप्त केलेल्या सामानाच्या लिलावास कार्योत्तर मंजुरी देणे.

**ठराव क्र. १३५ :-**

imara¹Baa[-Mdr mahanagarpailakocyaa Aavaarat AitËmaNa ivaBaagaamaaf-t jaPt krNyaat Aalaolyaa hatgaaDyaa¸ baaoD-¸ ba^nar va [tr saamaanaacao $.98¸500À¹ evaZo maulyaaMkna zrvaUna “dOinak vaata-hr” yaa vaR<ap~at ilalaavaacaI saucanaa p`isaQd krNyaat AalaolaI haotI. sadr saucanaonaUsaar KalaIla zokodaranaI maudtIt Anaamat r@kma Ba$na ilalaavaat Baaga Gaotlaolaa haota.

1. mao.esa. ema T/DIMga kM.
2. hsamau_Ina [MTrp`ayajaosa
3. Ajamala hsana pTola
4. p`SaaMt koLuskr
5. fkIr mahmmad Kana
6. naUr mahmmad caaOQarI
7. isakMdr SaoK
8. AbdUla mannaana
9. mahmmad sakIla
10. jakI Allaa Kana
11. e.eca. [MTrp`ayajaosa
12. esa.ko. [MTrp`ayajaosa
13. Abdula maijad
14. krmahusaona majahur hk
15. ramaidp maaOya-

varIla zokodaraMnaI ilalaavaat Baaga Gao}na KalaIla p`maaNao baaolaI baaolaNyaat AalaI.

| | |
|---|---|
| 1. AbdUla mannaana | $. 98¸600À¹ |
| 2. Ajamala hsana pTola | $. 99¸ 100À¹ |
| 3. AbdUla mannaana | $. 99¸200À¹ |
| 4. Ajamala hsana pTola | $. 1¸00¸000À¹ |
| 5. AbdUla mannaana | $. 1¸01¸000À¹ |
| 6. Ajamala hsana pTola | $. 1¸01¸100À ¹ |

varIla pOkI EaI Ajamala hsana pTola yaaMcaI $. 1¸01¸100À¹ hI baaolaI savaa-t jaast Asalyaanao sadr ilalaava maMjaUr k$na zokodarakDUna sadr saMpUNa- r@kma jamaa k$na Gao}na ilalaava krNyaat Aalaolaa Aaho. %yaasa kayaao-<ar maMjaUrI doNyaat yaot Aaho.

**सुचक :- श्री. चंद्रकांत वैती.** **अनुमोदन :- श्री. दिनेश नलावडे**

**ठराव बहुमताने मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थिन सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे आभार मानून आजची सभा येथे संपल्याचे जाहिर करत आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दु. ०१.३० वा.**

**सभापती**
**स्थायी समिती,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगर सचिव,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**